RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७६ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.८ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## रामलल्लाचा भव्य प्रतिष्ठापना सोहळा; घराघरांत आमंत्रण, अक्षता वाटप, राज्यातील १ कोटींपेक्षा अधिक रामभक्तांचा जल्लोष

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारीला होणार आहे. त्यानिमित्त गृहसंपर्क अभियान राबवण्यात येतंय. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाच्या वतीने घरोघरी अक्षता आणि मंदिराचे फोटो पाठवून २३ जानेवारीपासून श्री रामाच्या दर्शनासाठी या असं आग्रहाचं निमंत्रण पाठवलं जाते आहे. आधी महाराष्ट्रात ९५ लाख कुटुंबात असं निमंत्रण पाठवण्याचं नियोजन होतं. मात्र, आता कार्यकर्त्यांचा उत्साह आणि लोकांची राममय भावना लक्षात घेता १ कोटीपेक्षा जास्त कुटुंबापर्यंत हे निमंत्रण जाईल असा अंदाज विश्व हिंदू परिषदेचे महाराष्ट्र गोवा प्रांत मंत्री गोविंद शेंडे यांनी व्यक्त केला आहे.

अयोध्येतील राम मंदिर प्राण प्रतिष्ठेचा अनुषंगाने श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच्या वतीने सामान्य नागरिकांच्या घरी अक्षदा आणि मंदिराचं फोटो पाठवून २३ जानेवारीपासून श्री रामाच्या दर्शनासाठी या असे आग्रहाचे निमंत्रण दिले जात आहे. आधी महाराष्ट्रात ९५ लाख कुटुंबात असे निमंत्रण पाठवण्याचे नियोजन होते. मात्र, आता कार्यकर्त्यांचा उत्साह आणि लोकांची राममय भावना लक्षात घेता १ कोटीपेक्षा जास्त कुटुंबापर्यंत हे निमंत्रण जाईल अशी स्थिती आहे. हा आकडा १ कोटी ५ लाखाच्या पुढे ही जाऊ शकतो असा अंदाज आहे. श्रीरामाच्या मंदिरासाठी लोकांच्या भावना अप्रतिम आहे, आम्हाला ही कधी नव्हे असे अनुभव येत आहे. त्यामुळे आमचे कार्यकर्ते उत्साहाने अक्षदा पोहोचवून श्रीरामाच्या



दर्शनासाठी जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाण्याचे प्रयत्न करत असल्याची माहिती गोविंद शेंडे यांनी दिली आहे.

**महाराष्ट्रातील ३५५ साधू – संतांनाही अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी निमंत्रण**

महाराष्ट्रातून एकूण ८८९ जणांना राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले असून त्यामध्ये ५३४ विशेष निमंत्रित आहेत. त्यामध्ये उद्योग, क्रीडा, कला तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा समावेश आहे.तर महाराष्ट्रातील ३५५ साधू – संतांनाही अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी खास निमंत्रित करण्यात आलं आहे.अयोध्येत राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जोरदार तयारी सुरु आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असल्याने प्रशासन आणि मंदिर ट्रस्टकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

### २२ जानेवारीला आसाममध्ये राम मंदिराच्या उद्घाटनानिमित्त 'ड्राय डे' जाहीर

अयोध्येतील भव्य राम मंदिराचं उद्घाटन २२ जानेवारीला आयोजित करण्यात आला आहे. रामललाच्या अभिषेक सोहळ्यासाठी देश-विदेशातील अनेक दिग्गज उपस्थित राहणार आहेत. या दिमाखदार सोहळ्यासाठी संपूर्ण अयोध्या नगरी सज्ज झाली आहे. अशातच देशातही २२ जानेवारीला मोठा उत्सव साजरा केला जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर आसाम सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. आसाम सरकारनं २२ जानेवारीचा दिवस 'ड्राय डे' म्हणून घोषित केला आहे. म्हणजेच, या दिवशी राज्यात दारूची दुकानं बंद राहणार आहेत. संपूर्ण राज्यात २२ जानेवारीला दारूविक्रीसाठी बंदी असेल. आसामच्या एका मंत्र्यानं यासंदर्भात माहिती दिली आहे.

## बांग्लादेशची सत्ता शेख हसीना यांच्याकडेच पाचव्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचा पाचव्यांदा पंतप्रधान होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांवर विरोध पक्षांनी बहिष्कार टाकला होता. त्यामुळे या निवडणुकीत शेख हसीना यांच्या पक्षाला ३०० पैकी २०० जागांवर विजय मिळालाय. तर शेख हसीना स्वत: २ लाख ४९ हजार ४९६ मतांनी विजय मिळवला आहे.



बांग्लादेशमध्ये शेख हसीना पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत. पाचव्यांदा शेख हसीना पंतप्रधानपदी विराजमान होणार आहेत. रविवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांचा पक्ष अवामी लीगनं ३०० जागांपैकी दोनतृतीयांशपेक्षा जास्त जागा जिंकल्या आहेत. २००९ पासून बांग्लादेशची सत्ता शेख हसीना यांच्याकडेच आहे. त्यापूर्वी १९९१ ते १९९६ या काळात शेख हसीना पंतप्रधान होत्या.

आतापर्यंत झालेल्या मतमोजणीत शेख हसीना यांच्या पक्ष अवामी लीगनं ३०० संसदीय जागांपैकी २२४ जागा जिंकल्या आहेत. बांगलादेश राष्ट्रीय पक्षानं चार जागा जिंकल्या आहेत. अपक्षांनी ६२ जागा जिंकल्या आहेत, तर इतरांनी एक जागा जिंकली आहे. दरम्यान, उर्वरित दोन जागांसाठी अजूनही मतमोजणी सुरू आहे.

शेख हसीना त्यांचा लोकसभा मतदारसंघ गोपालगंज-३ मोठ्या मताधिक्यानं विजयी झाल्या. त्यांना २,४९,९६५ मतं मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी एम. निजामउद्दीन लष्कर यांना अवघी ४६९ मतं मिळाली.

## शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल तयार? सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार, १० जानेवारीपर्यंत निकाल अनिवार्य

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रतेचा निकाल तयार झाल्याची चर्चा आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांच्या निकालपत्राचा मसुदा कायदेशीर अभिप्रायासाठी दिल्लीतील तज्ज्ञांकडे पाठवल्याचं समजतं. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार १० जानेवारीपर्यंत निकाल देणं अनिवार्य आहे.



सर्वोच्च न्यायालयानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी १० जानेवारीपर्यंत निकाल जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष १० जानेवारीपर्यंत वाट न पाहाता, आज किंवा उद्यापर्यंतच निकाल जाहीर करू शकतात, अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. 'लोकसत्ता'नं दिलेल्या वृत्तानुसार, शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल तयार असून विधानसभा अध्यक्षांनी ही निकालाचा मसुदा दिल्लीला कायदेशीर अभिप्रायासाठी तज्ज्ञांकडे पाठवला आहे.

**राहुल नार्वेकर-मुख्यमंत्री शिंदे यांच्यात चर्चा**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात रविवारी (७ जानेवारी २०२४) वर्षा बंगल्यावर चर्चा झाली. दोघांच्या भेटीचं कारण अद्याप गुलदस्त्यात आहे, मात्र १० जानेवारीला नार्वेकर आमदार अपात्रतेप्रकरणी निकाल देणार असल्यानं चर्चांना उधाण आलं आहे.

**राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना नोटीस**

आमदार अपात्रताप्रकरणी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना विधिमंडळ सचिवालयाकडून नोटीस धाडण्यात आली आहे. दोन्ही गटाकडून कागदपत्रंही दाखल करण्यात आली आहेत. एकमेकांविरोधात केलेले आरोप प्रत्यारोप खोडण्याची संधी दोन्ही गटांना सुनावणी दरम्यान मिळणार आहे.

## विझलेल्या मशालींचा उजेड पडत नाही

### मुख्यमंत्री शिंदेंचा ठाकरेंना टोला



**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक रत्नागिरी**

केंद्र शासनाने गेल्या दीड वर्षांत या महाराष्ट्रातील जनतेसाठी जे- जे काही केलं त्याची एक पुस्तिका तयार करू आणि ती पुस्तिका देखील आपण घराघरामध्ये लोकांना पोहोचवली पाहिजे. कारण त्याच्यातून त्यांना माहिती पडेल की, शासनाने कोणते-कोणते निर्णय घेतलेले आहेत. त्याचबरोबर आपला पक्ष जोडण्याचं काम देखील आपल्याला करायचं आहे. तुम्हाला माहिती आहे की, मी फिल्डवर उतरून काम करणारा मुख्यमंत्री आहे. घरात बसून, उंटावरून शेळ्या हाकणारा मुख्यमंत्री नाही. असे म्हणत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मिशन ४८, शिवसेनेचा शिवसंकल्प अभियानाची आज सोमवार (८ जानेवारी) पासून रत्नागिरीतून सुरूवात झाली आहे. यावेळी आयोजित सभेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केल्याचे दिसून आले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मी प्रत्यक्ष फिल्डवर जातो, काम करतो. स्वच्छता अभियान सुरू केलं, तर तिकडे पोटदुखी सुरू झाली. कारण लोकं त्याच्यामध्ये सहभागी होऊ लागले. पण फक्त मुंबई स्वच्छ करून मी थांबणार नाही. तर या महाराष्ट्रामध्ये हे स्वच्छता मोहीम या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबवू. महाराष्ट्र स्वच्छ, सुंदर करू आणि त्याचबरोबर जे कोणी या विकासाच्या विरोधात आपल्या उतरतील त्यांची सफाई आपल्या माध्यमातून होईलच आणि म्हणून आज सर्वसामान्य माणसाचं आयुष्य आहे त्यांच्यामध्ये जीवनामध्ये बदल आपल्याला घडवायचा आहे. असेही वक्तव्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं.

### तेव्हा इंडिया आघाडी गाजर खात होती

चार राज्यामध्ये निवडणूका झाल्या त्यावेळेस देखील खपवळर आघाडी खुशीमध्ये गाजरं खात होती. परंतु या तीन- चार राज्यातील लोकांनी त्यांना सडेतोड उत्तर दिलं आणि मोदींची गॅरंटी लोकांनी स्वीकारली. त्यांच्यावर विश्वास दाखवला. आणि म्हणून आज आपल्याला एवढंच मला विचारायचं आहे की, आपल्या देशाची परदेशात जाऊन बदनामी करणारा माणूस आपल्याला पाहिजे की, या देशासाठी एक एक दिवस एक एक क्षण समर्पित भावनेने काम करणारा प्रधानमंत्री आपल्याला पाहिजे हा विचार आपल्याला करण्याची आवश्यकता आहे. म्हणून कुणाला काय मिळेल? यापेक्षा मला काय मिळालं यापेक्षा मी देशाला काय दिलं? माझ्या राज्याला काय दिलं? माझ्या जिल्ह्याला काय दिलं? हे महत्वाचं आहे. असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

## मोदी म्हणाले, २२ जानेवारीला दिवाळी साजरी करा आंबेडकर म्हणतात, एक हजार रुपये द्या

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नांदेड**

येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येत रामल्ललाची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. अनेक वर्षाच्या संघर्षानंतर अखेर अयोध्येत राम मंदिर साकार होत असल्याने या सोहळ्याकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं आहे. या सोहळ्यासाठी अयोध्या नगरीच नव्हे तर अवघं उत्तर प्रदेश सज्ज झालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर २२ जानेवारी रोजी देशभर दिवाळी साजरी करा, असं आवाहन केलं आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मोदी यांच्या या आवाहनाचं स्वागत केलं आहे. पण दिवाळी साजरी करण्यासाठी देशभरातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना प्रत्येकी एक हजार रुपये देण्याची मागणी केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी त्यांनी ही मागणी केली. अयोध्येतील रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेचं मला अजून निमंत्रण आलेलं नाही. मी वर्तमानपत्रातून वाचतोय निमंत्रण येणार आहे. त्यामुळे मी निमंत्रणाची वाट पाहत



आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या दिवशी दिवाळी साजरी करायला सांगितलं आहे. मोदींनी या पूर्वा टाळ्या वाजवा, थाळ्या वाजवा म्हणून सांगितलं होतं. आम्ही त्यांचा सल्ला ऐकला होता. त्यांचा आताचं आवाहनही आम्ही मान्य करू. पण देशात अनेक कुटुंब दारिद्र्य रेषेखालील आहेत. त्यांना मोदींनी प्रत्येकी एक हजार रुपये द्यावेत. म्हणजे त्यांना घरात गोडधोड करता येईल आणि दिवाळी साजरी करता येईल, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

**पंतप्रधानांच्या इच्छापूर्तीसाठी तरी**

२२ जानेवारी रोजी दिवाळी साजरी करायची असेल तर दारिद्र्य रेषेखालील लोकांना दिवाळी साजरी करायची असेल तर त्यांना पदरमोड करावी लागेल. स्वत:चा खर्च केल्याने त्या महिन्यात त्यांना इतर दिवशी गोडधोड करता येणार नाही. त्यांना गोडधोड करण्याचा त्याग करावा लागेल. ते होऊ नये म्हणून सरकारने दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक कुटुंबाला प्रत्येकी एक हजार रुपये द्यावेत. म्हणजे ते दिवाळी साजरी करतील. २२ जानेवारी रोजी दिवाळी साजरी करा, ही पंतप्रधानांची इच्छा आहे. पंतप्रधानांच्या इच्छापूर्तीसाठी तरी एक हजार रुपये दिले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.




## निवडणुकीच्या फेऱ्यात अडकली 'पणन'ची कापूस खरेदी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

केंद्र सरकारकडे परवानगी मागण्यात आली होती. गेल्या महिन्याच्या अखेरीस सीसीआयने राज्यात आपले अभिकर्ता म्हणून कापूस उत्पादक पणन महासंघाला कापूस खरेदीची परवानगी दिली आहे. पण, अद्याप सीसीआयसोबत करारनामा झालेला नाही. कापूस पणन महासंघाला कापूस खरेदीसाठी कर्ज घ्यावे लागते, त्यासाठी राज्य सरकारची हमी,



खरेदीसाठी लागणारे मनुष्यबळ ही सर्व व्यवस्था अद्याप झालेली नसल्याने पणन महासंघामार्फत खरेदी सुरू होऊ शकली नाही.दुसरीकडे, पणन महासंघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या निवडणुकीचा निकाल ९ जानेवारी रोजी जाहीर होणार आहे. त्यानंतर अध्यक्षाची निवड आणि प्रशासकीय बैठक यात किमान १५ दिवसांचा कालावधी लागू लागेल. अध्यक्षाच्या निवडीनंतरच यासंदर्भात निर्णय होऊ शकेल, असे सांगितले जात आहे.

गेल्या दोन वर्षांपासून पणन महासंघाला सीसीआयने कापूस खरेदीची परवानगी दिली नव्हती. खुल्या बाजारात यंदा कापसाच्या दरात मोठी घसरण झाल्याने सरकारी खरेदीची प्रतीक्षा होती. सीसीआयने विदर्भात ३४ खरेदी केंद्रांवर कापूस खरेदीची व्यवस्था सुरू केली असली, तरी ही संख्या अपुरी असल्याने पणन महासंघाच्या कापूस खरेदीची प्रतीक्षा अजूनही शेतकऱ्यांना आहे.

## पुणे लोकसभा पोटनिवडणुकीला 'सर्वोच्च' स्थगिती; आता मुहूर्त सार्वत्रिकतेचाच

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

पुण्याचे भाजप खासदार द्विगंत गिरीश बापट यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर निवडणूक घ्यावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने एका याचिकेवर सुनावणी दरम्यान दिले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने आज ८ जानेवारी रोजी झालेल्या सुनावणीत स्थगिती दिली आहे. तेव्हा पुणे लोकसभा निवडणुकीला सार्वत्रिक निवडणुकीच्याच मुहूर्ताची वाट पहावी लागणार आहे एवढे मात्र खरे.




पुण्याचे भाजप खासदार द्विगंत गिरीश बापट यांच्या निधनानंतर पुणे मतदार संघाची जागा रिक्त आहे. या जागेवर निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छूक असल्याने सगळ्याच पक्षातील उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून उभे ठाकलेले होते. यामुळेच रिक्त झालेल्या जागेवर पोट निवडणूक घेण्याचे आदेश देण्यात यावे अशा मागणीची याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाने ही पोटनिवडणूक घेण्यात यावी असे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाला निवडणूक आयोगाकडून सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या आव्हानात्मक याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असून, मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे पुणे लोकसभेच्या पोटनिवडणूक ही आता सार्वत्रिक निवडणुकीसोबतच घेतल्या जाणार असल्याचे निश्चित झाले आहे.

## संपादकीय ......

# जुन्या पेन्शनचे मधाचे बोट

राज्य सरकारने गुरुवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक धडाकेबाज निर्णय घेतले. यामध्ये राज्य शासकीय कर्मचार्यांना जुन्या पेन्शन योजनेचा अंशत: लाभ देण्याचा निर्णय लक्षवेधी ठरला आहे. एका बाजूला जुन्या पेन्शनसाठी राज्य सरकार सकारात्मक असल्याचा संदेश देत सातत्याने संपाचे हत्यार उपसणार्या राज्य सरकारी कर्मचार्यांना थोपवून धरण्याचे काम या निर्णयाने केले आहे, तर दुसरीकडे निवडणुकीदरम्यान अडचणीचा ठरणार्या विरोधकांच्या हातातील कळीचा मुद्दाही काढून घेतला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पदभरतीची जाहिरात दिलेल्या किंवा अधिसूचित केलेल्या पदांना आणि नियुक्त कर्मचार्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणार आहे.

या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे २६ हजार राज्य सरकारी अधिकारी आणि कर्माचार्यांना होणार असल्याचे म्हटले जात असले, तरी प्रत्यक्षात ४ ते ५ हजार अधिकारी-कर्मचार्यांनाचा या योजनेचा लाभ मिळेल, असे राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे म्हणणे आहे. या योजने अंतर्गत जुनी पेन्शन हवी की नको यापैकी एकाची निवड करण्याचा पर्यायही सरकारने कर्मचार्यांना दिला आहे. या निर्णयानुसार पात्र ठरणार्या शासकीय अधिकारी, कर्मचार्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक असणार आहे. जे राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना नवी पेन्शन योजनाच लागू राहील. तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहणार आहे.

आर्थिक भार पेलणे शक्य नसल्याने केवळ निवडणुका जिंकण्यासाठी लोकप्रिय निर्णय न घेतल्यास त्याचा राज्याच्या तिजोरीला मोठा फटका बसेल, याची सत्ताधार्यांसह विरोधकांनाही जाणीव आहे. त्यामुळेच सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्याला थेट नकार न देता सरकारने आस्ते कदम चालायचे ठरवले आहे. विरोधकांनीदेखील जुन्या पेन्शनच्या मागणीला पाठिंबा देत सत्ताधार्यांना कात्रीत पकडले आहे. सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्यासोबतच सेवानिवृत्त झालेल्या आणि वयाची ८० वर्षे पूर्ण केलेल्या सरकारी कर्मचार्यांना केंद्र सरकारप्रमाणे वाढीव निवृत्तीवेतन देण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले आहे. सरकारवरील अर्थभार यामुळे नक्कीच वाढणार आहे. तूर्तास निवडणुकीआधीच्या थांब्यावर सत्ताधार्यांनी सरकारी अधिकारी-कर्मचार्यांना जुन्या पेन्शन योजनेच्या नावाने मधाचे बोट चाटवले, हे मात्र नक्की.

# आज भी याद है ऋतंबरा की गर्जना

# कहो गर्व से हम हिन्दू है हिन्दुस्थान हमारा है !

*अमरावतीचे भव्य सायंस्कोअर मैदानावरचे गर्दीचे सर्व विक्रम मोडल्या गेले ते श्रीरामजन्मभूमी मुक्ती आंदोलनातील अग्रणी आणि ओजस्वी वाणीच्या वक्तृया साध्वी ऋतंबरा देवींच्या जाहीर सभेने !श्रीरामजन्मभूमी आंदोलनात साध्वी ऋतंबरा देवी नावाचा एक झंझावात होता. त्यावेळी पेन ड्राईव्ह नव्हता.*

*ऑडिओ कॅसेट्सचा जमाना होता. पण अल्पावधीत सर्वाधिक कोणाच्या कॅसेट्स विकल्या गेल्या असतील तर त्या ऋतंबरा देवींच्या भाषणाच्या. त्यांच्या भाषणांनी सर्वत्र वेड लावले होते. अनेक मठ मंदिरांमध्ये त्या कॅसेट्स वारंवार लावल्या जायच्या. त्यांची ओघवती शैली वैचारिक विरोधकांनाही त्यांची भाषणे ऐकायला प्रवृत्त करीत होती. त्या काळात एका मोठ्या काँग्रेस नेत्याचा मुलगा माझा मित्र होता. त्याने आपल्या वडिलांना ऐकायच्या आहेत म्हणून माझ्याजवळून सर्व कॅसेट्स नेल्या होत्या. बिचार्‍यांना मोठ्या आवाजात ऐकण्याची सोय नव्हती !साध्वी ऋतंबरा देवी आपल्या भाषणातून बेगडी धर्मनिरपेक्षतेवर कडाडून हल्ला चढवायच्या.*

*आपली गौरवशाली हिंदू परंपरेची मांडणी करून त्या श्रीरामजन्मभूमी विरोधकांवर प्रखर प्रहार करायच्या. तरुण, सात्विक व लोभस व्यक्तिमत्व, आवाजाला विलक्षण धार आणि अमोघ वक्तृत्वाच्या आधारावर त्या केवळ सभा जिंकायच्याच नव्हे तर समाजामध्ये परिणामकारक बदल घडवून आणायच्या.मला आजही साध्वी ऋतंबरा देवी यांच्या भाषणात नेहमी ऐकलेल्या ओळी आठवतात. 'वीर शिव प्रताप का गुंज उठा*



*नारा है, कहो गर्व से हम हिन्दू है हिन्दुस्थान हमारा है !'यातील शेवटचे 'कहो गर्व से हम हिन्दू है हिन्दुस्थान हमारा है !' हे वाक्य सभेला उपस्थित असलेले हजारो लोक दोन्ही हात वर करून म्हणायचे तेव्हा अंगावर रोमांच उभे व्हायचे.राम, गंगा और कृष्ण का जो विरोधी, जो हमसे टकराएगा वो कुत्ते की मौत यहाँ पर मारा जायेगा ।अरे दुश्मनोंको माँ दुर्गा के बेटो ने ललकारा है, कहो गर्व से हम हिन्दू है हिन्दुस्थान हमारा है !और महाकाल बन कर हम दुश्मन से टकरायेंगे, जहा बनी थी बाबरी मस्जिद अपना मंदिर वही बनायेंगे ।और काशी मथुरा वृन्दावन ने एक साथ हुंकारा है गर्व से कहो हम हिन्दू है हिन्दुस्थान हमारा है !*

*आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या माध्यमातून त्या राष्ट्राचा अभिमान देखील जागवायच्या. धर्मरक्षक श्रीरामचंद्राच्या जीवनातील प्रेरक प्रसंगांची मांडणी करून त्या सर्व हिंदूंनी आपापले जाती, पंथ, संप्रदाय, पूजा पद्धती, खानपान, चालीरीती असे सर्व प्रकारचे भेद संपवून एकत्र येण्याचे आवाहन त्या पोटतिडकीने करायच्या.अमरावतीच्या त्यांच्या सभेचे संचालन करण्याची जबाबदारी संघटनेने माझ्यावर सोपवली होती. बजरंग दलाचा जिल्हा संयोजक म्हणून मी कार्यरत होतो. परिणामी त्यांच्याशी तेव्हा संवाद साधण्याची संधी पण मिळाली होती. भगवे वस्त्र धारण केलेल्या एका साध्वीचे केस 'बॉय कट' का आहेत, हा प्रश्न काहींनी कुजकट पणे केला होता म्हणून त्यांना थेट तसे विचारले. अमरावतीच्या किंवा विदर्भाच्या दौर्‍यापूर्वी त्यांना अटक होणार होती. पोलिसांचा गराडा चुकवण्यासाठी त्यांनी वेशांतर केले व त्यासाठी त्यांना आपले लांबसडक केस कापावे लागले असल्याचे कळले. त्यापूर्वी दिग्विजय सिंह यांनी त्यांना इंदौर येथे सभेपुर्वी अटक केली होती. एखाद्या कुख्यात गुन्हेगाराला देतात तशी वागणूक देण्यात आली होती. कोणालाही अटक केल्यानंतर पोलीस त्याला चोवीस तासात न्यायालया समक्ष उपस्थित करतात. पण दिग्विजय सिंह यांनी सूडाच्या भावनेने त्यांना पाच दिवस कोठडीत डांबून ठेवले होते.*

*सत्तेचा गैरवापर करून विरोधकांना छळण्याचा फटका साध्वी ऋतंबरा देवी यांनाही सहन करावा लागला होता.ऋतंबरा देवी या महामंडलेश्वर स्वामी परमानंद यांच्या शिष्या आहेत. वयाच्या सोळाव्या वर्षांपासून त्या अध्यात्मिक क्षेत्राकडे वळल्या होत्या. श्रीरामजन्मभूमी न्यासाचे माजी अध्यक्ष आणि माजी खासदार डॉ. राम विलास वेदांती यांच्या संपर्कातून त्या श्रीरामजन्मभूमी आंदोलनाशी जोडल्या गेल्या. अशोकजी सिंहल, आचार्य गिरीराज किशोर आणि परमहंस रामचंद्रदास यांचा साध्वी ऋतंबरा यांना स्नेह मिळाला आणि त्यांची योग्यता पाहून त्यांच्यावर जनजागरणाची जबाबदारी सोपविण्यात आली. काल पर्वा मला साध्वी ऋतंबरा यांचे ताजे विधान ऐकायला मिळाले. रामकार्यात आपला वाटा केवळ खारीचा होता, हे त्यांचे विधान त्यांच्यातील नम्रता दर्शवणारे आहे. वर्तमानात त्यांनी अनाथ, निराधार महिला, बाल यांच्यासाठी वात्सल्यग्रामची निर्मिती करून मोठे सेवा कार्य उभे केले आहे. देशातील साधू संत त्यांना 'दीदी माँ' म्हणून संबोधतात.बाबरी ढाचा ध्वस्त करण्याच्या प्रकरणी गठीत लिब्रहान आयोगाच्या अहवालात साध्वी ऋतंबरा देवी यांच्यावरही ठपका ठेवण्यात आला होता.*

*कारसेवकांनी बाबरी ढाचा ध्वस्त केला तेव्हा ऋतंबरा देवी श्रीराम घोषात तल्लीन होत्या. त्या उन्मुक्तपणे नाचत जनसमुदायाला प्रेरित करीत होत्या. आजही श्रीरामजन्मभूमी आंदोलन आठवले की प्राधान्यक्रमाने साध्वी ऋतंबरा देवी आठवतात.*

**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा,**
**महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**



# दर्यापूरात 'मनसे'च्या वतीने पत्रकारांचा सन्मान

## १४ वर्षापासूनची परंपरा कायम



**दि८ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर –** मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त सर्वत्र मोठ्या उत्साहात पत्रकार दिना आयोजित करण्यात आला होता.याच अनुषंगाने गेल्या १४ वर्षापासून सातत्याने दर्यापूर येथे पत्रकार दिनाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात येत असते.यावर्षी सुद्धा सदर कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना दर्यापूर तालुका यांच्या वतीने तालुकाध्यक्ष मनोज तायडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते.याप्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पत्रकार एस एस मोहोड उपस्थित होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार गजानन देशमुख, सुरेशसिंग मोरे,शशांक देशपांडे उपस्थित होते.याप्रसंगी दर्यापूर तालुक्यातील संजय कदम,अनंत बोबडे,युवराज डोंगरे,धनंजय धांडे,विकी होले, सचिन मानकर,अमोल कंटाळे, गौरव टोळे,धनंजय देशमुख,रवी नवलकार, महेश बुंदे, विनोद शिंगणे, सचिन बोडदे,राम रघुवंशी,विलास महाजन आदी उपस्थित होते. याप्रसंगी मनसेच्या वतीने पर्यावरणाचा संदेश देत तालुक्यातील सर्व पत्रकार यांचा वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी एस एस मोहोड,गजानन देशमुख,सुरेशसिंग मोरे,शशांक देशपांडे, विकी होले, महेश बंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच अखिल भारतीय मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजक दरवर्षी पत्रकार दिनाचे आयोजन करणारे मनसेचे तालुकाध्यक्ष मनोज तायडे व सर्व पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.याप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मनोज तायडे,उपतालुकाध्यक्ष पंकज कदम,मनसे जनहित कक्ष तालुकाध्यक्ष गोपाल तराळ, मनसे पदाधिकारी कुली आप्पा,संदीप झळके, संतोष रामेकर,नंदू नवले,प्रथमेश राऊत,अनिकेत सुपेकर, भूषण टेकाडे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज पाटील तायडे यांनी केले तर संचलन प्रा धनंजय देशमुख व आभार प्रदर्शन पंकज कदम यांनी केले. स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# डिजिटल तंत्रज्ञानाने पत्रकारितेचा फॉरमॅट बदलविला: संपादक सरिता कौशिक

## आयआयएमसीत मराठी पत्रकारिता दिनानिमित्त संपादक संवाद



**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** डिजिटल माध्यमांनी पत्रकारितेचे अंतरंग बदलविले आहे. तंत्रज्ञानाच्या आगमनाने बातमी प्रसारणाचे स्वरूप गतिमान झाले मात्र पत्रकारितेचे मूळ मूल्य बदलले नाही. काल पत्रकारिता ज्या हेतूने आणि ध्येयाने केली जात होती ती आजही त्यानुसारच केली जात आहे फक्त पत्रकारितेचा फॉरमॅट बदलला आहे तो डिजिटल झाला आहे असे मत एबीपी माझा वृत्तवाहिनीचे कार्यकारी संपादक सरिता कौशिक यांनी व्यक्त केले. ते आयआयएमसीत आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसरात मराठी पत्रकारिता दिनानिमित्त संपादक संवाद अंतर्गत डिजिटल युगातील मराठी पत्रकारिता या विषयावर दिनांक ६ जानेवारी रोजी विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सरिता कौशिक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या प्रसंगी संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, डॉ विनोद निताळे, डॉ आशिष दुबे उपस्थित होते. पुढे बोलताना सरिता कौशिक म्हणाले, मराठी पत्रकारिता या नव माध्यमांमुळे पूर्वी पेक्षा अधिक गतिमान झाली आहे. स्मार्ट फोन मुळे आज बातमी लोकांच्या खिशात पोहचली आहे. डिजिटल पत्रकारितेमुळे क्षणार्धात कोणतीही घटना आता लोकांपर्यंत पोहचविणे शक्य झाले आहे. डिजिटल माध्यमांनी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. माध्यमात केवळ नौकरी करण्यासाठी नाही तर या क्षेत्रात उदयोजक म्हणून करियर करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाने संधी उपलब्ध करून दिली आहे. या नवं माध्यमाचा वापर केवळ मनोरंजनासाठी करू नका तर रोजगाराचे आणि व्यवसायाचे नवीन साधन म्हणून विद्यार्थांनी या कडे बघावे असा सल्ला देखील त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सरिता कौशिक यांच्याशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी मराठी पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी 'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी' हे गीत सादर केले. यावेळी प्रायोगिक वृत्तपत्राचे देखील प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ राजेश कुशवाहा यांनी डिजिटल माध्यमांची भाषा शैली यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ विनोद निताळे यांनी तर पाहुण्यांचा परिचय डॉ आशिष दुबे यांनी करून दिला.याप्रसंगी मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## तूर, मूग नाही तर थेट कुळथाच्या डाळीने घटते वजन, सद्गुरु सांगतात प्रोटीनचा उत्तम सोर्स आहे ही डाळ

*दि.८ विदर्भ प्रजासत्ताक*

*शरीराला प्रोटीन मिळावे यासाठी आपण डाळ खातोच. पण इतर डाळींपेक्षा कुळिथाच्या डाळीमध्ये प्रोटीनचे प्रमाण जास्त असते. ईशा फाउंडेशनचे संस्थापक आणि प्रमुख सद्गुरु जग्गी वासुदेव सांगतात, 'कुळिथाची डाळ ही केवळ प्रथिनांचा उत्तम स्रोत नाही तर, अनेक गंभीर आजारांशी लढण्यास देखील मदत करते. शरीराला या डाळीतील गुणधर्म मिळावे असे वाटत असेल तर, काही तासांसाठी डाळ पाण्यात भिजत ठेवा मग मोड आलेली डाळ खा. यामुळे पचनसंस्था सुधारते.*

***मोड आलेली कुळीथ डाळ फायदेशीर –** कुळीथ डाळीमध्ये प्रोटीनचे प्रमाण जास्त असते. त्यातील गुणधर्मामुळे शरीर आतून गरम होते. त्यामुळे नेहमी मोड आलेली कुळीथाची डाळ खावी. ज्यामुळे ही डाळ सहज पचेल.*

***शरीरात तयार करते उष्णता–** सद्गुरूंच्या मते, कुळीथाच्या डाळीमुळे शरीरात उष्णता निर्माण होते. ज्यामुळे मसल्स बिल्ड आणि वजन कमी करण्यास मदत होते. शरीरातील उष्णता संतुलित ठेवायची असेल तर, कुळीथाची डाळ खाल्ल्यानंतर मोड आलेली हिरवे मुग खाऊ शकता. हिरव्या मुगामध्ये देखील प्रोटीनचे प्रमाण जास्त असते.*

***वजन कमी करण्यास होते मदत–** कुळिथाच्या डाळीमध्ये प्रोटीन आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यात आढळणारे घटक फॅट बर्नर म्हणून काम करतात. यासह एलडीएल कोलेस्टेरॉल कमी करून एचडीएल कोलेस्टेरॉल वाढवण्यास मदत करतात. शिवाय या डाळीमुळे*



*पचनक्रियाही सुधारते.*

***ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित ठेवते***

*कुळिथाची डाळ खाल्ल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. यासह शरीरातील इन्शुलिन प्रतिरोधक क्षमता देखील सुधारते. एकूणच, ही मसूर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त ठरते.*

***हृदयासाठी फायदेशीर***

*या डाळीमध्ये लिपिड्स आणि फायबर असते. जे रक्तातील एलडीएल कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते. यासह हृदयाच्या नसांमध्ये अडकलेले खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यास मदत करते. ज्यामुळे ब्लड सर्क्युलेशनमध्ये अडचण येत नाही.*

# पाच शाळकरी मुलांनी दामटली एकच दुचाकी, व्हिडिओ व्हायरल

## वाहतूक शाखेकडून त्या मुलांचा छडा, पालकांना समज.

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** पाच शाळकरी मुले एकच दुचाकी चालवत असल्याचा व्हिडिओ शनिवारी समाजमाध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला. तो पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यापर्यंत देखील पोहोचला. त्यांनी त्यांची गंभीर दखल घेत वाहतूक एसीपींना कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार, व्हिडिओमध्ये दिसणारी दुचाकी, त्यावरील पाचही मुलांची अवघ्या पाच-सहा तासात ओळख पटविण्यात आली. त्यांच्या पालकांना बोलावून समज देण्यात आली.

दंड होत असला तरी ट्रीपलसीट वाहने चालविणे अगदी सामान्य बाब आहे. त्यात कळस म्हणजे एका दुचाकीवर चक्क पाचजण बसलेले अन् तेही सगळेच अल्पवयीन. त्यामुळे वाहतूक एसीपी मनीष ठाकरे व्हायरल व्हिडिओमधील दुचाकी वाहनाचा नोंदणी क्रमांक (एमएच २७ एवाय ५१४०) असल्याबाबतची खात्री करून घेतली. नोंदणी क्रमांक आधारे वाहनाचे मालक मोहम्मद अन्सार (रा. अचलपूर) यांचे सोबत संपर्क केला. आपण ते वाहन चार वर्षांपूर्वी अमरावतीमधील शेख सादिक शेख रजा यांना विक्री केल्याचे अन्सार यांनी सांगितले. त्याआधारे शेख सादिक यांचा शोध घेऊन व्हायरल व्हिडिओमधील दुचाकीबाबत विचारणा केली



असता ती दुचाकी आपण जेल कॉर्टर परिसरातील एका व्यक्तीला विक्री केल्याचे सांगितले. पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नसतानाही मनीष ठाकरे व वाहतूक विभागातील अंमलदारांनी तत्काळ त्या इसमाचा शोध घेतला. त्यास पाच शाळकरी विद्यार्थ्यांचा व्हायरल व्हिडिओ दाखविला असता, ती दुचाकी आपलीच असल्याचे त्याने सांगितले. त्यावरील पाच मुलांपैकी दोन मुले आपले असल्याचे मान्य करून ते शिवाजीनगर परिसरातील एका शाळेत शिक्षण घेत असल्याचे त्याने सांगितले.

### सात हजारांचा दंड

सहायक पोलिस आयुक्त मनीष ठाकरे व पोलिस निरीक्षक संजय आढाव, अंमलदारांनी अवघ्या पाच ते सहा तासात घटनेचा छडा लावला. दुचाकीवरील पाचही मुलांच्या पालकांना वाहतूक विभाग कार्यालयात बोलावून समज दिली. या प्रकरणी त्या दुचाकीवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून सात हजार रुपये दंड आकारण्यात आला. वाहतूकच्या पूर्व शाखेने ते वाहन जप्त केले. ते प्रकरण लवकरच न्यायालयात सादर करण्यात येईल.आपण आपले शाळकरी व अल्पवयीन मुलांना ज्यांच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नाही, अशा मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये. असा प्रकार आढळल्यास वाहतूक विभागातर्फे प्रभावी कारवाई करण्यात येईल. वाहन चालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे.

**मनीष ठाकरे– प्रभारी सहाय्यक पोलिस आयुक्त वाहतूक**

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# ज्यांच्यावर पडली 'ताऊंची' थाप...ते आहेत यशस्वी आज

## श्री हव्याप्र मंडळात माजी विद्यार्थी मेळावा ठरला कृतज्ञता सोहळा






**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – पद्मश्री प्रभाकरराव वैद्य ! एक वादळ, सक्षम नेतृत्व आणि भारदस्त व्यक्तीमत्वासह संवेदशील मनाचा माणूस. ज्यांची आदरयुक्त भीती आजही जगण्याला एक दिशा देते. महाविद्यालयीन जीवनामध्ये बुलेट वरून फिरणाऱ्या ताऊंनी लावलेली शिस्त, संस्कार आणि वेळ पडल्यास पाठीवर पडलेली थाप अनेकांसाठी आशिर्वाद ठरला. मंडळाची माती आणि लाडक्या ताऊंसह येथील प्राध्यापकांनी शिक्षण नव्हे तर आयुष्य कसं जगावं ? कशासाठी जगावं हे शिकवलं. त्यामुळे आज माजी विद्यार्थी मेळाव्यास सहभागी होणे म्हणजे ३० वर्षांची तपस्या फलित झाली असल्याचा सूर माजी निष्ठावान विद्यार्थ्यांचा होता. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे वर्ष १९९१ ते १९९४ मधील माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन शुक्रवार दि.५ जानेवारी २०२३ रोजी मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृह येथे पार पडला. विद्यार्थी मेळाव्याच्या माध्यमातून आलेल्या निष्ठावान माजी विद्यार्थ्यांनी ३५ वर्षानंतर मंडळाची मातीचा स्पर्श होणे म्हणजे एक तप पुर्ण झाल्याचे समाधान व्यक्त करीत लाडके ताऊ (पद्मश्री प्रभाकरराव वैद्य साहेब) व श्री हव्याप्र मंडळाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विशेष म्हणजे, माजी विद्यार्थ्यांनी मंडळामध्ये प्रवेश करण्याआधी मंडळाच्या प्रवेशद्वारावर नतमस्तक होत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांना जयजयकार केला. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालीत डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेश महाविद्याल या च्या माजी विद्यार्थी संघ (अल्युमनी) द्वारे आयोजीत या माजी विद्यार्थी मेळाव्याला अध्यक्ष म्हणून डिसीपीचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे उपस्थित होते. प्रमुख अतिथी मध्ये प्रा. आर.एस तिवारी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. अजयपाल उपाध्याय, मंडळाच्या सचिव व अॅल्युमनी उपाध्यक्ष डॉ. माधुरीताई चेंडके, प्रा. नाना पाटील, प्रा. डॉ. संजय मराठे, प्रा. डॉ. जयंत गोडसे, प्रा. डॉ. विकास कोळेश्वर, डॉ. डब्ल्यू. डि कॅन्डी, प्रा. डॉ. किशोर खांडवे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. सत्यनारायण शर्मा, डॉ. सुर्यकांत पाटील, प्रा. डॉ. विलास दलाल, प्रा. डॉ. संतोष इंगोले, प्रा. तुलसी राव वंजारी, विदर्भ केसरी डॉ. संजय तिरथकर आदी गुरूजन उपस्थित होते. मेळाव्याची सुरूवात मान्यवरांच्याहस्ते दिपप्रज्वलनाने झाली. यांनतर माजी विद्यार्थी संजय डागर, नरेंद्र तोमर शर्मा, संजय धामा, निलिमा देशपांडे, बाबुलालजी, जसविंदर सींग, रविंद्र खत्री, सुरज, शैलेंद्र मिश्रा, विजेंद्र सिंग, गोवर्धन सिंग, सोनी गुप्ता यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी गुरूपुजन करीत व्यासपीठावर उपस्थित गुरूजनांचा हृदयस्पर्शी सत्कार केला. यावेळी माजी विद्यार्थी वर्गातर्फे पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, डॉ. अजयपाल उपाध्याय यांचा स्मृती चिन्ह, शाल देत सत्कार करण्यात आला. तसेच माजी विद्यार्थी मेळाव्या करीता अथक परिश्रम घेणारे माजी विद्यार्थी संघाचे सचिव प्रा. ललीत शर्मा, कोषाध्यक्ष प्रा. आशिष हाटेकर, सहसचिव डॉ. डब्ल्यु कॅन्डी सिंग यांचे माजी विद्यार्थी वर्गार्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष डॉ. अजयपाल उपाध्याय यांनी केले. संचालन प्रा. आशिष हाटेकर तर आभार प्रा.विजय राठी यांनी मानले. डॉ. दिनानाथ नवाथे, डॉ. प्रतिमा बोंडे, डॉ. संजय तिरथकर, डॉ. मनोज कोहळे, प्रा. डॉ. देवानंद सावरकर, प्रा. नाहीद परवीन, प्रा. अमृता, प्रा. प्रियांशू आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग होते.कलर बॉक्सअसाच ऋणानुबंध जोपासूआज आम्ही विविध क्षेत्रात यशस्वी आहोत. याचे श्रेय केवळ आणि केवळ श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व आमचे लाडके ताऊ म्हणजेच पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांना जाते. आज तब्बल ३० ते ३५ वर्षानंतर मंडळाच्या मातीचा स्पर्श झाला. हा क्षण आमच्या सर्वांकरीता अविस्मरणीय क्षण असून विद्यार्थी मेळाव्याच्या माध्यमातून परत तेच महाविद्यालयीन जीवनाची अनुभूती होत आहे. आज श्री हव्याप्र मंडळाचा व्याप वाढला आहे. त्यात मंडळाला प्रामुख्याने डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाला क्रीडा विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ व आमचे महाविद्यालयाच्या विकासासाठी आमचे सहकार्य व ऋणानुबंध असाच कायम राहील असा विश्वास माजी विद्यार्थी श्री संजय डागर, नरेंद्र तोमर शर्मा, संजय धामा, निलिमा देशपांडे, बाबुलालजी, जसवींदर सींग, रविंद्र खत्री यांचे सह सर्व माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगीतले.

## आदिवासींचे साखळी उपोषण १८ व्या दिवसावर

*__दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती__ :आदिवासी समाजाला मिळणाऱ्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी काही जाती या अनुसूचित जमातीमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. याविरोधात २१ डिसेंबरपासून जिल्हा कचेरीवर आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीच्या नेतृत्वात साखळी उपोषण सुरू आहे. परंतु १७ दिवसानंतरही याची प्रशासनाने दखल घेतलेली नाही, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे. रविवार भीम आर्मी या संघटनेनेदेखील उपोषण मंडपाला भेट देऊन पाठिंबा जाहीर केला आहे.राज्यात आरक्षणाचा मुद्दा पेटला असताना आदिवासी समाज बांधव आणि कोळी महादेव समाज बांधव यांच्यात आता वाद पेटला आहे. अमरावती जिल्ह्यात तथा विदर्भात वास्तव्यास असलेल्या कोळी समाज बांधव आदिवासी असल्याचा दावा करीत आहे. मात्र, ते आदिवासी नसल्याचे आदिवासी आरक्षण बचाव कृती समितीने केला आहे. शासनाने त्यांना विनाअट अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे हा खऱ्या आदिवासींवर अन्याय असल्याचे कृती समितीचे म्हणणे आहे. स्वतःला आदिवासी समजणाऱ्या जातींना राज्य शासनाने विशेष मागास प्रवर्गमधून आरक्षण दिले आहे. त्या अनुसूचित जमातीच्या कोणत्याच निकषांमध्ये बसत नसल्याचा आरोप समितीने केला आहे.*

*त्यामुळे इतर समाजाला देण्यात आलेले जात प्रमाणपत्र तत्काळ रद्द करण्यात यावे, विशेष पदभरती प्रक्रिया राबवावी. आदिवासी समाजाचे आरक्षण धनगर समाजाला देण्यात येऊ नये, या मागण्यांसाठी उपोषण सुरू आहे. यावेळी अर्जुन युवनाते, हेमंत राऊत, उत्तम मरापे, चेतन माळवे, स्वप्नील खांदे, निकेश सलामे उपस्थित होते.*

## जिल्हा वार्षिक योजनेचा पालकमंत्र्यांनी घेतला ऑनलाईन आढावा मंजूर

### नियतव्ययानुसार नियोजित विकासकामे वेळेत पूर्ण करा –पालकमंत्री

### जिल्ह्यासाठी ३७१ कोटीच्या प्रारूप आराखड्याला मंजुरी



**दि.८ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ ची प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आदी कार्यवाही तात्काळ पूर्ण करून विकासकामांना चालना द्यावी. विहित मुदतीत ही कामे पूर्ण करावी. तसेच यंत्रणांनी तात्काळ प्रस्ताव सादर करावे, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजनेतील सन २०२३-२४ व सन २०२४-२५ चा प्रारूप आराखड्याचा आढावा पालकमंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांनी नुकताच घेतला.जिल्हा नियोजन समितीची सभा नियोजन भवनात झाली.बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, आमदार बळवंत वानखडे, विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच विविध विभागप्रमुख आदी उपस्थित होते.बैठकीत सन २०२३-२४ व सन २०२४-२५ जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारुप आराखडा पीपीटीद्वारे सादरीकरण करण्यात आले. सन २०२४-२५ च्या प्रारूप आराखड्यात विविध यंत्रणांकडून सर्वसाधारण योजनेत १ हजार १७० कोटींची मागणी करण्यात आली आहे. तथापि, महत्त्वाच्या कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिली. यावेळी सन २०२३ २४ च्या खर्चास मंजूरी व सन २०२४-२५ जिल्हा वार्षिक योजनेच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली. जिल्ह्यासाठी ३७१ कोटीच्या प्रारूप आराखड्याला यावेळी मंजुरी देण्यात आली .बैठकीमध्ये खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा व आमदार बळवंत वानखडे यांनी आदिवासी क्षेत्र व जिल्ह्यातील विविध विकासकामासाठी अतिरिक्त वाढीव मागणी केली. पांदण रस्त्याच्या विकासासाठी लातूर जिल्हाधिकारी यांनी राबविलेल्या लातूर पॅटर्न पद्धत जिल्ह्यात राबविण्याच्या सूचना दिल्या.

## रक्तदान करून कर्मचाऱ्यांनी जिल्हा बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळप्रति व्यक्त केली कृतज्ञता

### १२० कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान पगारवाढी च्या निर्णयाचा कर्मचाऱ्यांकडून जल्लोष





**दि.८ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** ११,१२तब्बल बारा वर्षानंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्मचाऱ्यांचा पगार वाढीचा निर्णय जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू ,उपाध्यक्ष अभिजीत ढेपे व संचालक मंडळांनी घेतलेला आहे, या पगारवाढीबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी रक्तदान करण्याचा अभिनव उपक्रम रविवारी राबवला , यादरम्यान १२० कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले,

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांना तब्बल दहा ते बारा वर्षानंतर पगार वाढीचा निर्णय अध्यक्ष आमदार बच्चू कडू ,उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांच्या नेतृतवात घेण्यात आलेला आहे, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी या निर्णयाचा जल्लोष करीत करीत संचालक मंडळांचा सत्कार समारंभ तसेच रक्तदान करून कृतज्ञता व्यक्त करण्याचा अभिनव उपक्रम रविवारी बडनेरा मार्गावरील जाधव पॅलेस येथे राबविला, यावेळी अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळांचा सत्कार देखील कर्मचारी संघटनांच्या वतीने करण्यात आला, या कार्यक्रमाला जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. बच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, संचालक नरेशचंद्रजी ठाकरे, रवींद्र गायगोले, अजय मेहकरे, सुरेखाताई ठाकरे, चित्राताई डहाणे, प्रशांतभाऊ डहाणे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्रजी बकाल व मोठ्या संख्येने बँकेचे कर्मचारी उपस्थित होते,

## जिल्ह्यातील अनेक गावात 'मुन्नाभाईंचा' चा कहर

### बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट–** शहरासह तालुक्यात काही ठिकाणी बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे. हाताखाली प्रॅक्टिस केलेल्या तरुणांनी ग्रामीण भागातील रुग्णांवर हायफाय उपचार करण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.यामध्ये बंगाली डॉक्टरने शहरासह ग्रामीण भागात आयुर्वेदिक उपचारांच्या नावाखाली दवाखाने थाटले आहेत. आयुर्वेदिक पद्धतीने जुनाट आजारांवर उपचार करणार अशा उपचारांचे नामफलक लावले आहेत. आतमध्ये अॅलोपॅथिक औषधांच्या उपचारांवर जोर देऊन रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे. रुग्णांना उपचाराच्या नावाखाली



लुटण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. रुग्णांना उपचाराच्या नावाखाली लुटण्याचा गोरखधंदा सुरू केला आहे. याकडे जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, शहरातील ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक दुर्लक्ष करत असल्याने बोगस डॉक्टरांचा रुणाला लुटण्याचा धंदा बोकाळला आहे.त्यांच्या चुकीच्या उपचाराने अनेकदा रुग्ण गंभीर झाले होते. पणत्या रुणाला विलंब न लावता मोठ्या – शहरातील दवाखान्यात उपचारासाठी – पाठवल्याची अनेक उदाहरणे आहेत.

■ शहरातील प्रश्न ग्रामीण रुग्णालयाचे अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात येतो. शहरात व ग्रामीण भागात ज्या गावात उपचारांच्या नावाखाली बंगाली डॉक्टर रुग्णांवर औषध, सलाईन लावून उपचार करत असेल तर या बोगस व्यक्तीवर गुन्हा दाखल करून त्या ठिकाणचा धंदा बंद करणे आवश्यक आहे.

## चांदूर रेल्वे येथे गुरांच्या आठवडी बाजाराला प्रारंभ

**दि.८विदर्भ प्रजासत्ताकचांदूर रेल्वे :** स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य यार्डवर रविवारी गुरांच्या आठवडी बाजाराला ७ जानेवारी रोजी प्रारंभ झाला. दर रविवारी येथे गुरांची खरेदी-विक्री केली जाणार आहे.शुभारंभाचा मान निखिल दामोदर होले (रा. चांदूर रेल्वे), जीवन शेळके (रा. टेंभुर्णी), अभिषेक तायवाडे (रा. अमदोरी), नीलेश देंगे (रा. चांदूर रेल्वे) या शेतकऱ्यांना मिळाला. त्यांचे माजी आमदार वीरेंद्र जगताप, सभापती गणेश आरेकर तसेच उपस्थित संचालक यांनी शाल-श्रीफळ देऊन स्वागत केले. बैलजोड्यांचे पूजन करण्यात आले. चांदूर रेल्वे तालुक्यातील सर्व पशुधारक शेतकरी, गुरांचे व्यापारी, दलाल बंधूनी पशुधन (जनावरे) दर रविवारी खरेदी- विक्रीकरिता बाजार समितीच्या मुख्य यार्डवर आणावे, असे आवाहन जगताप यांनी केले. याप्रसंगी माजी उपसभापती भानुदास गावंडे, पंचायत समिती सदस्य अमोल होले, सोसायटी अध्यक्ष हर्षल वाघ, रंगराव चौधरी, गजानन आमले, जीवन शेळके, बाजार समिती उपसभापती रवींद्र देशमुख (जाधव), संचालक राजेंद्र राजनेकर, प्रभाकर वाघ, रामेश्वर वानखडे, रावसाहेब शेळके, मंगेश धावडे, अतुल चांडक, वर्षा वाघ, पूजा देशमुख, वसंता गाढते आदी उपस्थित होते.

## तुरीला खाजगी बाजारात मिळतोय अधिक भाव नाफेड ला प्रतिसाद नाही

### ऑनलाईन नोंदणीसाठी १६ केंद्रे

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** : वर्षभरा पासून तुरीला खासगी बाजारात हमीदरापेक्षा जास्त भाव व पेमेंटही नगदी आहे. त्यामुळे नाफेडद्वारा बाजारभावाने तूर खरेदी केली जाणार आहे. यासाठीच्या ऑनलाइन नोंदणीला मात्र शेतकऱ्यांचा फारसा प्रतिसाद नसल्याचे दिसून येते.

त्याचवेळी सोयाबीन, हरभरा व कापसाला खासगीत हमीभाव मिळत नसताना शासनाद्वारा खरेदी केली जात नाही, असा दुजाभाव होत असल्याचा शासनाचा आरोप आहे. दोन वर्षांपासून तुरीचे भाव उच्चांकी आहेत. त्यामुळे साहजिकच शेतकऱ्यांचा कल खासगीमध्ये विक्रीकडे आहे. त्यामुळेशासनाने यंदा तूर हमीभावाऐवजी बाजारभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने जिल्हा मार्केटिंग अधिकारी व व्हीसीएमएफचे केंद्र सुरू केलेले आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा कल नसल्याने नोंदणीला नाममात्र प्रतिसाद असल्याचे दिसून येते. शासनाने सन २०२३-२४ करिता तुरीला सात हजार रुपये क्विंटल असा हमीभाव जाहीर केलेला आहे. प्रत्यक्षात बाजार समित्यांमध्ये तुरीला साडेआठ हजारांवर भाव आहे. येथील बाजार समितीमध्ये शनिवारी अधिकतम ८८०० रुपये क्विंटल भाव मिळालेला आहे. शिवाय पेमेंटही नगदीमध्ये असल्याने शेतकरी नाफेड कडे उत्सुक नसल्याचे दिसून येते.

### नाफेडसाठी मुंबईवरून ठरणार तुरीचे दर

नाफेडद्वारा यंदा बाजारभावाने तूर खरेदी केली जाणार आहे. त्यामुळे खासगी बाजाराच्या तुलनात्मक दर शेतकऱ्यांना मिळणार आहे. प्रत्यक्षात यासाठी दर मुंबई कार्यालयातून निश्चित केले जाणार आहेत. त्यामुळे स्थानिक बाजारात यापेक्षा जास्त दर असल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. याउलट कमी दर असल्यास फायदा होण्याची शक्यता आहे.



### ■ तुरीच्या हंगामाला महिनाभर अवधी

बाजार समित्यांमध्ये नवीन तूर विक्रीसाठी येत आहे व यामध्ये ओलावा जास्त असल्याने ६०० ते ७०० रुपयांनी दर कमी मिळत आहेत. प्रत्यक्षात यंदा मान्सूनच्या विलंबामुळे पेरण्यांना उशीर झाला होता. त्यामुळे महिनाभरानंतर जिल्ह्यात तुरीचा हंगाम सुरू होणार आहे. त्यामुळेही आवक नसल्याने नाफेडला प्रतिसाद मिळत नसल्याचेही सांगण्यात आले.

# नागपूरच्या इग्नू रिजनल सेंटरच्या विद्यार्थ्यांनी पटकावला फिरता चषक

## रितेश तिवारी,सौरभ गुळदे, अनिरिद्ध तळेगावकर पुरस्काराचे मानकरी






### स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

**दि८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचा फिरत चषक यावर्षी नागपूर येथील इग्नूरिजनल सेंटरच्या चमू ने पटकावला.वैयक्तिक गटात नागपूर येथील रितेश तिवारी याने प्रथम तर सौरभ गुळदे अमरावती, आशुतोष तळेगावकर पुरस्काराचे मानकरी ठरले. डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती व स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने आंतर महाविद्यालयीन राज्य स्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन ४ रोजी करण्यात आले होते. स्पर्धेचे हे २२ वे वर्षे होते. स्पर्धेत धुळे, नाशिक, पुणे, गडचिरोली, नागपूर, बुलडाणासह विविध जिल्ह्यातील ५० स्पर्धक सहभागी झाले होते. आर्थिक निकषावरील आरक्षण देश हिताचे आहे या विषयावर स्पर्धकांमध्ये जोरदार वैचारीक दंगल रंगली. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर तर मुख्य अतिथी म्हणून विदर्भ युथ वेल्फेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे उपस्थित होते.यावेळी प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल घवळे, वैशाली घवळे (गरकल) व स्पर्धेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.प्रकाश दाभाडे व्यासपिठावर उपस्थित होते. स्पर्धेकरिता परीक्षक म्ह्णून कोल्हापूर येथील उमेश सुतार, धाराशिव येथील प्रशांत गुरव, घाटंजी येथील रुपेश कावलकर यांनी काम पाहिले यावेळी परिक्षकांसह अतिथींनी मनोगत व्यक्त करून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. वादविवाद स्पर्धेत जोरदार युक्तिवाद करताना स्पर्धकांत चुरस पहायला मिळाली. स्पर्धेत सांघिक विजेतेपद इग्नू रिजनल सेंटर नागपूर च्या रितेश तिवारी आणि आशुतोष तिवारी यांच्या संघाने पटकावले. वैयक्तिक प्रथम पुरस्कार रोख ११,००१ रू, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र रितेश तिवारी , नागपूर याने तर व्दितीय पुरस्कार रोख ७००१ , स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र सौरभ गुळदे, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती, तृतीय पुरस्कार रोख ५००१, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र अनिरुध्द तळेगांवकर लोकप्रशासन विभाग, नागपुर विद्यापीठ, विशेष उत्तेजनार्थ पुरस्कार आशुतोष इंगळे व करण पारेख यांनी पटकावले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व विजयी स्पर्धकांचे अभिनंदन करून त्यांना पारितोषिक देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर चौधरी यांनी केले तर आभार वैशाली गरकल यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संजय बनारसे, भीम बारसे, मंगेश तायडे, प्रा. अमित गावंडे, प्रा.शीतल तायडे, प्रा. रत्नाकर शिरसाठ, रणजित देशमुख, विजय देशमुख, प्रवीण गावंडे, प्रसाद पांडे, गौरव देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# पेसा क्षेत्रामधील १३ जिल्ह्यातील पदभरती लांबणीवर!

## सर्वोच्च न्यायालयात एकीकडे तारीख पे तारीख, दुसरीकडे वेट न्ड वॉच

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** सर्वोच्च न्यायालयात राज्यातील पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या याचिकेवर 'तारीख पे तारीख' चालू असून दुसरीकडे शासन 'वेट न्ड वॉच' भूमिकेत आहे.

सर्वोच्च न्यायालयात ९ जानेवारीला होणारी सुनावणी आता ३० जानेवारीला होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात प्रथम सुनावणी सुरू असताना निर्णयाची प्रत शासनाला येण्यापूर्वी त्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर २०२३ रोजी राज्य शासनाने घाईघाईने परिपत्रक निर्गमित करून अनुसूचित क्षेत्रातील भरती प्रक्रिया थांबवली आहे. त्यामुळे 'पेसा' क्षेत्रातील राज्यातील १३ जिल्ह्यातील पदभरती लांबणीवर पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यपालांनी २९ ऑगस्ट २०१९ रोजी ५ वी अनुसूचीच्या पॅरा ५ (१) नुसार अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या भरती संबंधात जनजाती सल्लागार परिषदेच्या शिफारशी नुसार अध्यादेश काढून त्यात लोकसंख्येच्या प्रमाणात १०० टक्के, ५० टक्के आणि २५ टक्के (कोतवाल आणि पोलिस पाटील वगळता) आरक्षण दिले आहे. या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यशासनाने १ फेब्रुवारी २०२३ आणि २८ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

मात्र ही अधिसूचना आणि शासन निर्णय यांना बिगर आदिवासींनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या बिगर आदिवासींना नोकरीपासून वंचित ठेवल्याने मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे, असा दावा बिगर आदिवासींनी केला आहे.

■ सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ ऑक्टोबर २०२३च्या निर्णयात भरतीप्रक्रियेला स्थगिती दिलेली नाही अथवा भरतीप्रक्रिया थांबवा, असे म्हटले नाही. ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. वेळ वाया न घालवता भरतीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून ठेवावी. सर्वोच्च न्यायालयाचे अंतिम आदेश आल्यानंतर नियुक्ती आदेश द्यावेत.

**–ॲड. प्रमोद घोडाम,** संस्थापक–अध्यक्ष ट्रायबल फोरम

### ■ ा १३ जिल्ह्यांतील भरती थांबली

सर्वोच्च न्यायालयाचे अंतिम आदेश येईपर्यंत पेसा क्षेत्रातील निवडप्रक्रियाबाबत कोणताही निर्णय घेऊ नये किंवा गरज वाटल्यास सामान्य प्रशासन विभागाचा अभिप्राय घेतल्याशिवाय पुढील कार्यवाही करू नये, असे निर्देश दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी मंत्रालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या १३ जिल्ह्यांतील १७ संवर्गातील भरतीप्रक्रिया प्रभावित झाली आहे.

# नाचोना येथील पीडित ग्रस्त कुटुंबाला प्रकाश आंबेडकर यांची सांत्वन्पर भेट



**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** दर्यापूर तालुका जिल्हा अमरावती येथे काही दिवसांपूर्वी मातंग समाजाच्या कुटुंबातील सदस्यांचे अपघाती निधन झाले होते, सदरील कुटुंबास आज अँड. प्रकाश आंबेडकरांनी सांत्वनपर भेट दिली.यावेळी पीडित कुटुंबास शासनाद्वारे आर्थिक मदत मिळवून देण्याचे तसेच कायदेशीर मदतीचे आश्वासन दिले. दर्यापूर तालुक्यातील नाचोना गावात आज बाळासाहेब आंबेडकरांनी मातंग समाजाचे पीडित कुटुंबाला भेट दिली व सांत्वन केले. खऱ्या अर्थाने वंचित समूहाच्या प्रश्नांना सातत्याने काम करणारे या देशातले एकमेव नेतृत्व आहे ते म्हणजे बाळासाहेब आंबेडकर आज रोजी नाचोना गावात त्यांनी भेट दिली सोबतच जिल्हा प्रभारी धैर्यवर्धन पुंडकर, युवक आघाडीचे महाराष्ट्र अध्यक्ष निलेशजी विश्वकर्मा, जिल्हाअध्यक्ष अंकुश वाकपांजर तसेच जिल्हा महासचिव साहेबरावजी वाकपांजर युवक आघाडी जिल्हा महासचिव सुमेध खंडारे जिल्हा प्रवक्ता रामजी राठोड तालुका अध्यक्ष संजीवन खंडारे,संतोष बागडे चंदू रायबोले विजय चोरपगार प्रफुल चोरपगार अनिकेत सदनशिव शुभम कांबळे सौरभ कोकाटे उत्कर्ष चोरपगार अमोल नवलकर प्रवीण लाजूरकर अतुल नळकंडे

# अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा पत्रकार दिन कार्यक्रम थाटात

## 'श्रमिक'तर्फे उल्लेखनीय कार्यासाठी पत्रकारांचा गौरव



**दि८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** : अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे शनिवार, ६ जानेवारीच्या पत्रकार दिनानिमित्त शहरातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चार पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलिस आयुक्त डॉ. नवीनचंद्र रेड्डी, मनपा आयुक्त देविदास पवार व मान्यवरांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. ११ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. पुरस्कार योजनेची प्रशंसा झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे होते. भारतीय जैन संघटनेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुदर्शन जैन, विद्यापीठाचे पीआरओ डॉ. विलास नांदूरकर,महावितरणचे पीआरओ फुलसिंग राठोड, पुरस्कारांचे 'प्रायोजक मतदार'चे संपादक अॅड. दिलीप एडतकर, हिंदुस्थानचे संपादक विलास मराठे, प्रतिदिन-वृत्त केसरीचे संपादक जयराम आहुजा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी पत्रकार संजय शेंडे यांना 'लक्षवेधी', अनुप गाडगे यांना 'प्रभावी', शैलश धुंदी यांना 'उत्कृष्ट' तर 'लोकमत'चे गणेश वासनिक यांना 'शोध' पत्रकारितेचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रारंभी दर्पणकारांना पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व संचालन संघाचे सचिव रवींद्र लाखोडे यांनी केले. पुरस्कार वितरणाबाबतची मांडणी गिरीश शेरेकर यांनी केली. आभार कृष्णा लोखंडे यांनी मानले.

### ■ सुरेश शुक्ल यांना जीवनगौरव

श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने यावर्षीपासून जीवनगौरव पुरस्कार सुरू करण्यात आला. स्व. सुमतीदेवी व डॉ. सोहनमल जैन, तख्तगड-राजस्थान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कोल्हापूरचे उद्योजक सुरेंद्र जैन यांनी पुरस्कृत केला आहे. पहिलाच पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सुरेश शुक्ल यांना जाहीर करण्यात आला. २१ हजार रोख, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लवकरच हा पुरस्कार सन्मानपूर्वक त्यांना देण्यात येईल.

## यावर्षीपासून दिला जाणार स्व. दादासाहेब काळमेघ पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार

# बाळशास्त्री जांभेकरांच्या पुतळ्याचे उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते लवकरच अनावरण



### अनिल अग्रवाल यांची घोषणा




# जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन उत्साहात

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** महाराष्ट्रातील सर्वच मराठी पत्रकारांचे आद्य असणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या राज्यातील पहिल्या पुतळ्याची निर्मितीची संकल्पना पुढे ठेवून अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाने नवे पाऊल उचलले आहे. सदर पुतळा निर्मितीचे काम सुरू असून लवकरच या पुतळ्याचे अनावरण राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केले जाईल अशी घोषणा अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी केली आहे.

वालकट कंपाऊंड परिसरातील मराठी पत्रकार भवन येथे आज अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार दिन तथा पत्रकार सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, भारतीय जनसंचार संस्थानचे अमरावती केंद्रिय संचालक राजेश कुशवाह, सकाळ वृत्तसमूहाचे संपादक राहुल गडपाले, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय शेंडे, सरचिटणीस प्रफुल्ल घवळे, सुधीर भारती यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अनिल अग्रवाल यांनी सांगितले की आजच्या काळात सर्वच पत्रकारांनी स्वतःला अपडेट करणे गरजेचे झाले आहे. येणारे दिवस हे अत्यंत घातक असण्याची शक्यता असून त्यासाठी आपले ज्ञान आणि तंत्रज्ञान दोन्हींचा संगम होणे आवश्यक आहे. नवोदित पत्रकारांनी सर्व जग हातात आहे असे न समजता दररोज वाचनाची सवय लावून घ्यावी असा मोलाचा सल्ला देखील दिला. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना हेमंत काळमेघ यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सुरू केलेल्या नियतकालकाचा उल्लेख करत पत्रकारिता क्षेत्रातील ऐतीहासिक बाबी उलगडून सांगितल्या. सोबतच राहुल गडपाले आणि कुशवाह यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात आपण स्वताला बदलणे गरजेचे असून नवे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक झाल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी, सूत्रसंचालन प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे यांनी तर आभार प्रदर्शन सरचिटणीस सुधीर भारती यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील अनेक पत्रकार, छायचित्रकार, इलेक्ट्रॉनिक्स मिडियाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ■ चाटजीपिटिवर लवकरच घेणार कार्यशाळा

जग दिवसेंदिवस बदलत चालले असून येणाऱ्या काळात स्वतःला स्पर्धेत टिकविण्यासाठी आपल्याला नवे तंत्रज्ञान अवगत होणे गरजेचे आहे. आज एआय आणि चाट जीपीटी च्या वापरातून अनेक बाबी सहज होत आहेत. ते समजून घेतल्यास आपले काम अधिक वेगाने करू शकतो. त्यामुळे हे तंत्रज्ञान पत्रकारांना समजून घेता यावे यासाठी जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने या विषयावर लवकरच कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल असे अनिल अग्रवाल यांनी यावेळी सांगितले

### ■ अशोक जोशी यांना जीवन गौरव पुरस्कार

अमरावती शहरात ३० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सेवा देणारे अशोक जोशी यांचा अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्प असे या पुरस्काराचे स्वरूप होते. सोबतच जनसंपर्क क्षेत्रात कार्य करणारे डॉ.विलास नांदुरकर, भूषण पुसदकर, फुलसिंग राठोड, अनिल मानकर, मंगला देशमुख यांचा देखील सन्मान अतिथिंच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि पुष देऊन करण्यात आला.

# स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत विद्यापीठाचा अविष्कार कोलते प्रथम



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** ग्रेटर नोयडा इन्स्टिटएुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी येथे नुकत्याच पार पडलेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा अविष्कार कोलते याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. वेल्लोर इन्स्टिटएुट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या चमूमध्ये त्याचा सहभाग होता व ही चमू सायबर सुरक्षेवरील 'फ्युचर फीट्स' या विषयामध्ये प्रथम क्रमांक मिळवून विजेती ठरली आहे. स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन हे सर्वात मोठे व आव्हानात्मक व्यासपीठ आहे. व्यावहारिक समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवून देणे, त्या माध्यमातून नवोपक्रम राबवून समस्या निराकरणाची आणि त्यासाठी चाकोरीबाहेर जाऊन विचार करण्याची वृत्ती वाढविणे हा या उपक्रमाचा उदात्त हेतू आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा शिक्षण नवोपक्रम कक्ष आणि ए.आय.सी.टी.ई. द्वारा राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामध्ये नॅशनल टेक्निकल रिसर्च ऑर्गनायझेशन तसेच इतर शासकीय संस्थांमिळून विद्यार्थ्यांना काही समस्या देऊन त्यांचे निराकरण करण्यास सांगितले जाते. अतिशय गुंतागुंतीच्या व आव्हानात्मक समस्येवर आविष्कार व त्याच्या चमूने योग्यशीर तोडगा शोधून या स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. आविष्कार कोलते हा विद्यापीठाच्या मराठी विभागात कार्यरत डॉ. प्रणव कोलते यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# आठ राज्यांच्या स्क्रीनिंग समितीच्या सदस्यपदी अॅड.यशोमती ठाकूर



**दि८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी काँग्रेसच्या वतीने विविध राज्यांसाठी नेमण्यात आलेल्या स्क्रीनिंग समितीमध्ये ड. यशोमती ठाकूर यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील केवळ दोन नेत्याचा स्क्रीनिंग समितीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे हा आपल्या कामाचा गौरव आणि महिलांच्या कर्तृत्वाला वाव देणारी असल्याची प्रतिक्रिया ड.यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी काँग्रेसच्या वतीने क्लस्टर निहाय अध्यक्ष आणि दोन सदस्यांची स्क्रीनिंग समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशभरातील सर्व राज्यांसाठी पाच क्लस्टर समित्या नेमण्यात आल्या आहेत. त्यानुसार हरीश चौधरी, मधुसूदन मिस्त्री, रजनी ताई पाटील, भक्त चरणदास आणि राणा केमी सिंग यांच्या अध्यक्षतेखाली या समित्या काम करणार आहेत.

## रजनी ताई पाटील यांच्याकडे राजस्थानची जबाबदारी

राज्यसभेतील खासदार रजनीताई पाटील यांच्याकडे राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, दिल्ली आणि दादरा नगर हवेली या राज्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्या या क्लस्टर समितीच्या अध्यक्षा म्हणून काम पाहणार आहेत. तर काँग्रेसच्या आमदार आणि माजी मंत्री अँड. यशोमती ठाकूर यांची उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब ,चंदिगड ,जम्मू काश्मीर आणि लडाख या राज्यांच्या स्क्रीनिंग समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत नीरज डांगी हे सहसदस्य असतील तर भक्तचरण दास हे अध्यक्ष असणार आहेत. पक्षाचे महासचिव केसी वेणुगोपाल यांनी ही यादी प्रसिद्ध केली असून पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या सर्व समित्यांची नियुक्ती केली आहे.

## हा तर माझ्या कामाचा गौरव – अॅड. ठाकूर

दरम्यान या संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना एडवोकेट यशोमती ठाकूर म्हणाल्या की, गेल्या अनेक वर्षांपासून आपण सामाजिक आणि राजकीय जीवनात सातत्याने काम करीत आहोत. महिला, शेतकरी आणि कष्टकरी वर्गासाठी आपण सातत्याने केलेल्या कामाचे हे फळ आहे. आगामी लोकसभा निवडणुकांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्क्रीनिंग समित्यांमध्ये महाराष्ट्रातील दोन महिलांचा समावेश होतो ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची आणि महिलांच्या कर्तुत्वाला वाव देणारी बाब आहे. माझ्यावर पक्षाने दाखवलेला विश्वास आणि सोपवलेल्या जबाबदारीला मी माझ्या कामातून निश्चितच न्याय देण्याचा प्रयत्न करीन, असेही ड. ठाकूर यावेळी म्हणाल्या.

# ७ हजार भाव, लोखंडही तापले सांगा, घरकुल कसे बांधायचे ?; अनुदान वाढीची मागणी

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

मोदी आवास घरकुल योजना, रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळतो. साहित्याचे दर वाढल्याने घरकुलाचे बांधकाम करणे अडचणीचे होत आहे. सिमेंटची बॅग ३३०, रेतीसाठी सात हजार तर लोखंडही महागल्याने घर बांधण्याचे स्वप्न पूर्ण करताना लाभार्थ्यांची दमछाक होत आहे.

ग्रामीण भागात गरीब आणि गरजू लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात येत आहे. घरकुलाचे मंजूर केलेले अल्प निधी संपूर्ण बांधकामासाठी आहे. १ लाख ४७ हजार रुपयाचे अनुदान ग्रामीण भागात बांधकामासाठी मंजूर करण्यात येत आहेत. घरकुलाचे बांधकाम करताना लाभार्थी कर्जबाजारी होत आहे.लाभार्थी हप्ते कर्जफेड करताना संपूर्ण आयुष्य निघून जात आहे.



ग्रामीण भागात सिमेंट, सळाख, विटा, मजूर व मजुरी आदी साहित्यांचे दर महागले आहे. सर्वत्र साहित्याचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम करणे कठीण होत आहे. घरकुल निधीत वाढ करण्याची मागणी घरकुल लाभार्थ्यांकडून होत आहे. अनेक लाभार्थ्यांना पदरमोड करावी लागत असल्याचे चित्र आहे.

# स्वातंत्र्यवीरांना जातीच्या चौकटीतून पहाणे हा गंभीर गुन्हा

## शुभम बायस्कार यांचे परखड मत सावरकर अध्यासन केंद्रात नोंदविले निरिक्षण

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्वतंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांचे आयुष्य त्यागमयी, संघर्ष शाली आहे. त्यांचा त्याग आणि संघर्ष येणाऱ्या अनंतपिढ्यांना प्रेरणा देणारा आहे. काही तथाकथित विचारवंत त्यांच्या मूळ संकल्पनेला हरताळ फासत त्यांना जातीच्या चौकटीतून बघण्याचा प्रयत्न करतात. हा अतिशय गंभीर गुन्हा असल्याचे सडेतोड निरीक्षण लेखक, पत्रकार, वक्ता शुभम बायस्कार यांनी नोंदविले. सावरकरांवर विविध आरोप प्रत्यारोप करणाऱ्या ट्रोलर्सचा समाचार घेत त्यांनी अभ्यासपूर्ण मत मांडून वास्तवाचीही जाणीवही करून दिली. महाराष्ट्र शासनाच्या सहकाऱ्यातून हरघर सावरकर समितीच्या वतीने पुण्यात राज्यातील विविध वक्तांची दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दरम्यान विचार व्यक्त करताना बायस्कार हे बोलत होते. कल्पनेच्या



पलीकडे मरणयातना अंदमानच्या सेल्युलर तुरुंगात सावरकरांनी भोगल्या. मात्र स्वतंत्रता देवीची उपासना, आराधना करण्याच्या संकल्पात खंड पडला नाही. ध्येयाप्रती असलेली त्यांची अढळ श्रद्धा, योगेश्वर श्रीकृष्णांची धार्मिक, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाची व टिळकांची राजकीय प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करत त्यांनी राष्ट्रभक्तीचा नवा आयाम घालून दिला. अंदमानात जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना काळकोठरीत राहून त्यांनी अंदमानच्या भिंती-भिंतीवर भारतीय स्वतंत्र्याचे समर लिहून भारताचा इतिहास भूगोल आणि वर्तमान बदलून टाकला. असीम संघर्षातून आकाराला आलेले जगाच्या इतिहासातील हे पहिलेच साहित्य. विध्वंस, विद्वेषाचे धुमारे उठवून सवरकरांना बदनाम करणाऱ्या तथाकथित विचारवंतांना पुराव्यानिशी उत्तर द्यायचे असेल तर सावरकरांच्या समग्र वाड:मय तरुणाईने अभ्यासने गरजेचे असल्याचे सांगत शुभम बायस्कार यांनी धनंजय कीर यांच्यासह विविध लेखक विचारवंतांच्या संदर्भ ग्रंथांचे दाखले आपल्या भाषणादरम्यान दिले. यावेळी, वि.दा.सावरकर यांचे पनतू सात्यकी सावरकर, महाराष्ट्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, माजी खासदार प्रदीप रावत, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे, अनंत फणशीकर, विद्याधर नारगोळकर, देवव्रत बापट, योगेश सोमण, चंद्रशेखर साने, अर्चना साने, अक्षय जोग, अश्विनी कुलकर्णी, गौरी कुलकर्णी, रोहन अंबिके, दुर्गा सावंत, सुमेध बागाइतकर, तुषार दामगुडे, अनुराधा मुंशी, चैतन्या जोशी यांच्यासह विविध मान्यवर मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# दुकानदारांनो, नायलॉन मांजा विकाल तर खबरदार

## पक्षी – प्राण्यांसह माणसाला ही धोका

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर**

आपण पतंग उडविण्याचे शौकीन असाल तर नायलॉन मांजाचा वापर करू नका. आपला आनंद दुसऱ्याच्या जीवावर बेतू शकतो. कारण पतंग उडवताना तुटलेला मांजा सहजरीत्या चिमण्यांना उपलब्ध होतो. त्यामुळे त्या मांजाचाच वापर चिमण्या घरटे तयार करण्यासाठी करतात. परिणामी त्या घरट्यासाठी वापरलेल्या मांजात चिमण्या व त्यांच्या पिल्लांचे पाय अडकून त्यांचा मृत्यू होतो. चिनी मांजा पक्ष्यांचा कर्दनकाळ ठरत आहे. नायलॉन मांजामुळे पशु, पक्षी आणि मनुष्याच्या जीवितास धोका असल्यामुळे या मांजाची विक्री आणि वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तरीही कुणी मांजा वापरत असेल तर खबरदार, आपल्यावर गोंदिया शहर पोलिस लगेच कारवाई करतील.



मकर संक्रांतीला पतंग उडवले जातात. मात्र, त्यासाठी नायलॉन मांजा वापरण्यात येत असल्याने पशु-पक्षी जखमी होत असतानाच कित्येकांचा जीव गेल्याच्याही अनेक घटना घडल्या आहेत..

मुले पतंगाच्या पळतानादेखील मागे अपघातग्रस्त होतात व अशात त्यांच्या जिवाला धोका निर्माण होतो. नायलॉन मांजा हा पर्यावरणासाठी हानीकारक असतो. तो लवकर तुटत नाही तसेच त्याचा नाशही होत नाही.नायलॉन मांजाची विक्री, साठा आणि वापर यावर न्यायालयाच्या आदेशानुसार बंदी घातली आहे.

नायलॉन मांजाच्या वापरामुळे शहरातील पक्षी-प्राण्यांसह माणसाला धोका आहे. दुचाकीस्वार नायलॉन मांजात गळा कापणे, चेहरा विद्रूप होणे तसेच नाक, कान व गालावर गंभीर जखमा माणसाला होतात.

# मुद्रांक शुल्क, दंड वसुलीसाठी अभय योजना

## थकबाकीदारांनो लाभ घ्या : मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**दि८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मुद्रांक शुल्काच्या वसुलीबाबत टांगती तलवार असलेल्या नागरिकांना दिलासा देणारी अभय योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. १ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ या दोन टप्प्यांत ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे १ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीत नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत दस्तातील शासनास देय होणाऱ्या, वसुलीस पात्र संपूर्ण शुल्क, त्यावर लागू होणाऱ्या दंडामध्ये सवलत लागू करण्यात आली आहे. या सवलतीचा लाभ पात्र व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या



वतीने करण्यात आले आहे.निवासी, अनिवासी औद्योगिक वापराच्या प्रयोजनासाठी केलेले सर्व व्यवहार, विक्री करारपत्रे, भाडेपट्ट्याचे दस्त, बक्षीसपत्र यासाठी लागू आहे.

**यावर करा अर्ज**

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित ९ मुद्रांक जिल्हाधिकारी किंवा दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात अर्ज करता यतो. अर्जाचा नमुना (igrmaharashtra.gov.in) तसेच सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व दुय्यम निबंधक कार्यालयात उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी नजिकच्या सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय किंवा दुय्यम निबंधक कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

**अशी मिळणार सवलत**

१ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० दरम्यान नोंदणी केलेल्या दस्तां- साठी पहिल्या टप्प्यात एक लाखापर्यंत मुद्रांक शुल्कासह दंडात १०० टक्के सवलत लाखापेक्षा अधिक मुद्रांक शुल्कावर ५० टक्के, तर दंडात १०० टक्के सवलत आहे.

१ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत देय होणाऱ्या मुद्रांक शुल्क रक्कम एक लाखांपर्यंत ५० टक्के सवलत आणि दंडात संपूर्ण सूट देण्यात आली आहे. मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यंत असल्यास मुद्राक शुल्कामध्ये २५ टक्के माफी व ९० टक्के सूट दिली आहे.

# सोशल मीडियाच्या अतिवापरावरून भांडणे : लॉकडाऊनपासून प्रमाण जास्त

## नवरा-बायकोचा जास्त वेळ मोबाइलवर; घटस्फोटाचे कारण

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

व्हॉट्सअॅप, फेसबुक या सोशल मीडियाचा वापर प्रचंड वाढल्याने तसेच जास्त वेळ मोबाइलवर वेळ घालवला जात असल्याने पती-पत्नींमध्ये वाद वाढले असून, ते थेट घटस्फोटापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे. हे वाद पोलिस ठाण्यांपर्यंत पोहोचत आहेत. विशेषकरून पती-पत्नी नोकरी किंवा व्यवसायानिमित्त वेगवेगळे राहत असल्यास अशा कुटुंबांमध्ये अधिकच गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अशा कुटुंबीयांमध्येच सोशल मीडियाच्या अतिवापरावरून भांडणे होत असल्याचे पुढे येत आहे.



**पती-पत्नीच्या वादाला मोबाइल हेच कारण**

मोबाइलवरील संभाषणासोबत व्हॉट्सअॅप चॅटिंग ही गोष्ट आता सर्रास सुरु असते. मोबाइल व चॅटिंग पती-पत्नीच्या वादाचे मोठे कारण आहे.

**नवरा वेळच देत नाही...**

दिवसभर नोकरी किंवा व्यवसायानिमित्त पती बाहेर असला तरी चालते. मात्र, सायंकाळपासून सकाळपर्यंत घरी राहून त्याने पत्नीशी हितगुज करणे आवश्यक आहे. पतीने पत्नीला वेळ दिला पाहिजे. मात्र, तसे होताना दिसत नाही. त्यामुळे अनेकवेळा भांडणे होत असतात.

**सोशल मीडियामुळे नवरा-बायकोतील संवाद कमी**

फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्रामच्या अतिवापरामुळे पती-पत्नी दोघेही आपल्याच विश्वात मग्न असतात. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे नवरा-बायकोतील संवाद कमी झाल्याचे दिसून येते.

# शिक्षक बॅंकेत आता पोट निवडणूकीचे वारे : पाच संचालक पद झाले रीक्त

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जि.प.शिक्षक बॅंकेत नुकतेच अविश्वास ठराव मंजुर झाल्या मुळे पाच संचालक पद रीक्त झाल्यामुळे या जागे करीता आता लवकरच पोट निवडणूक होणार आहे याचे वारे वाहत आहे.या निवडणूकी करीता आता शिक्षक कामाला लागले आहे.

शिक्षक बॅंकेच्या इतिहासात प्रथमच १६विरुध्द ५मताने पाच संचालकावर अविश्वास मंजुर झाला आहे.सहकार कायदा १९६० च्या कलम ७३(१)ड पोटकलम २०(२) नुसार ४जानेवारीला विरोधी पाच संचालकावर अविश्वास मंजुर झाला आहे.बॅंकेच्या विकास कामात वारंवार अडथळा निर्माण करणे,बॅंकेला इतर शाखा मिळू नये या करीता रिझर्व बॅंकेकडे केलेल्या तक्रारी,सेवानिवृत्त सभासदांना लाभांश मिळू नये याकरीता तक्रारी करणे,बॅंकेच्या उपविधीत व कायद्यात नसतांना बॅंकेच्या जवळपास पंधरासे सेवानिवृत्त सभासदांना नाममात्र करुन बॅंकेला एकाच दिवसी ६०ते७०कोटि रुपयांनीमायनस मध्ये आणण्याचा प्रयत्न करणे व त्यासाठी वारंवार तक्रारी करुन कोर्टात केस दाखल करणे असे कित्येक तक्रारी या पाच संचालकांनी केल्यामुळे त्यांच्यावर अविश्वास आणण्यात आला.सभासदांनी मोठ्या आसेने सभासदांच्या व बॅंकेच्या हिता करीता निवडून दिलेल्या या पाच संचालक यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही.विकास कामाला सुध्दा विरोध केला त्यामुळे त्यांना घरचा रस्ता पाहवा लागला.

या संचालक रीक्त पदामध्ये ओबिसी,एनटी व ३सर्व साधारण मतदार संघाची रीक्त झाली आहे.त्यामुळे या पाच जागे करीता सहकार विभागाने लवकरच पोट निवडणूक घ्यावी अशी मागणी शिक्षक बॅंकेचे सभासद करीत आहे.आता संध्दा २१संचालक मंडळ १६वर आले आहे.च्यामुळे पाच रीक्त पदा करीता पोट निवडणूक होणे आवश्यक आहे.

# काशिनाथ भक्तांच्या संयमाचा बांध फुटला

## अखेर मागणी असलेल्या जागेवर ‘काशिनाथ धाम’ चे भूमिपूजन : अवघ्या काही तासात भक्तांनी उभा केला मंडप

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**

ग्रामदैवत संत काशिनाथ बाबा यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य हजारो भक्त नांदगाव पेठ येथे दर्शनासाठी येतात मात्र जागेअभावी भक्तांची होत असलेली गैरसोय बघता काशिनाथ भक्तांनी नाफडे पेट्रोल पंप जवळील जागेची मागणी करत गत वर्षी हजारोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता परंतु वर्ष होऊनही शासन दखल घेत नसल्याने रविवारी भक्तांच्या संयमाचा बांध फुटला व भक्तांनी पडीक असलेल्या या जागेवरची अवघ्या काही तासात स्वच्छता करून या ठिकाणी काशिनाथ धाम चे भुजीपूजन करून पुण्यतिथी महोत्सवाचा मंडप देखील उभा केला.

गावाचे आराध्य दैवत संत काशिनाथ बाबा यांच्या १८ वा पुण्यतिथी महोत्सव १५ जानेवारी पासून प्रारंभ होणार आहे.१७ वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य विदर्भातून हजारो भक्तगण दर्शनासाठी याठिकाणी येत असतात.शिवाय संत, महंत, वारकरी यांची सुद्धा मोठी गर्दी असते मात्र एकच सभागृह असल्याने भक्त व मंडळींची याठिकाणी मोठी गैरसोय होते त्यामुळे नाफडे पेट्रोलपंप जवळील सर्व्हे नं.४८८ ही जागा भक्तनिवास व सभागृहासाठी देण्यात यावी अशी मागणी भक्तांच्या वतीने करण्यात आली होती.

३ एप्रिल २०२३ रोजी हजारो काशिनाथ भक्तांनी स्वयंस्फूर्तिने



जिल्हाधिकारी कार्यालय याठिकाणी पायदळ दिंडी मोर्चा काढून जागेचा विषय रेटून धरण्यात आला होता. खा. नवनीत राणा यांनी प्र.जिल्हाधिकारी अविष्यांत पंडा यांचेसमक्ष जागेचा विषय निकाली काढण्याचेआश्वासन दिले होते मात्र आश्वासन हवेत विरल्याने तसेच काशिनाथ भक्तांचा संयम सुटल्याने रविवारी हजारो काशिनाथ भक्तांनी मागणी असलेल्या जागेवर भुजीपूजन करून पुण्यतिथी महोत्सवाचा मंडप देखील काही तासातच उभा केला.

१५ जानेवारी पासून प्रारंभ होणारे भागवत सप्ताहाचे कार्यक्रम आता काशिनाथ धाम येथे पार पडणार असुन याठिकाणी सभागृह व भक्तनिवास सुद्धा उभारण्यात येणार असल्याचा निर्धार भक्तांनी यावेळी केला.श्री.संत काशिनाथ बाबा संस्थांन नांदगाव पेठ चे विश्वस्त शिवराजसिंह राठोड, अध्यक्ष विपुल पालिवाल,संदीप यावले,जीवन दलाल महाराज सह असंख्य भाविक भक्त याठिकाणी उपस्थित होते.

# 'मेरी झांशी नहीं दूंगी', यवतमाळमधून लोकसभा लढवण्यावर भावना गवळी ठाम

## महायुतीने दुसरा उमेदवार दिल्यास विरोधाचे संकेत



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ**

'मेरी झांशी नहीं दूंगी' या ऐतिहासिक घोषणेचा जयघोष करत शिवसेना शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांनी लोकसभेची निवडणूक लढवण्यावर आपण ठाम असल्याचे संकेत दिले आहेत. यवतमाळ वाशिम लोकसभेसाठी निवडणूक लढणारच आणि महायुतीने दुसरा उमेदवार दिल्यास त्याला विरोध करणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. या मतदारसंघातून महायुती भावना गवळी यांचा पत्ता कट करणार असून त्या ठिकाणी दुसरा उमेदवार दिला जाणार असल्याच्या चर्चा आहेत.

पोहरादेवी धर्मपीठाचे महंत सुनील महाराज यांनी भावना गवळी यांच्या उमेदवारीवर भाष्य केलं आहे. भाजपला भावना गवळी या लोकसभेसाठी उमेदरवार नको आहेत, त्यामुळे त्यांना यावेळी तिकीट मिळणार नसल्याचं भाकीत त्यांनी केलंय. एबीपी माझाशी बोलताना ते म्हणाले की, यवतमाळ वाशिमच्या खासदार भावना गवळी यांना लोकसभेच्या उमेदवार म्हणून स्वतः शिंदे गट आणि भाजपाची पसंती नाही. तसेच लोकांचाही त्यांना मोठा विरोध आहे हे भाजपच्या लक्षात आलं आहे. त्यामुळे त्यांना तिकीट मिळणार नाही.

**यवतमाळ वाशिम शिवसेनेचा बालेकिल्ला**

शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदारसंघाची ओळख आहे. पण यावेळेची परिस्थिती काहीशी वेगळी आहे. यावेळी शिवसेनामध्ये फूट पडलेली आहे. शिवसेनेच्या विद्यमान खासदार भावना गवळी यांनी शिंदे यांना साथ दिली आहे. त्यामुळे या ठिकाणी उमेदवार देण्याची तयारी ठाकरे गटाकडून सुरू आहे.

पोहरादेवीचे महंत सुनील महाराज या ठिकाणाहून लोकसभेसाठी इच्छुक आहेत. महाविकास आघाडीच्या माध्यमातून या ठिकाणी निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. या मतदारसंघातल बंजारा समाजाची मतं मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांच्या उमेदवारीचा फायदा होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

# शिल्पा पाचघरे यांच्याकडून जीवे मारण्याचे धमकी

## सचिन रोडे व मुकुंद बर्गी यांची पोलीस संरक्षणाची मागणी

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भाजपच्या तथाकथित पदाधिकारी शिल्पा पाचघरे यांच्याकडून वारंवार दबाव तंत्राचा वापर करून बांधकाम बंद पाडण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे. बांधकाम सुरू असताना त्यांनी काही हल्लेखोरांच्या सहाय्याने पोस्टर बॅनर फाडून मजुरांना अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे शिल्पा पाचघरे यांच्याकडून जीवितास धोका असल्याची तक्रार कंत्राटदार सचिन रोडे व भूखंड मालक मुकुंद बर्गी यांनी पोलीस आयुक्तांना दिली आहे. यासंदर्भात पोलीस आयुक्ता लयाकडून पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे.



पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये सचिन रोडे यांनी सांगितले की, श्री कॉलनी येथील प्लॉट क्रमांक १३ हा मुकुंद बर्गी यांच्या नावे असून त्यांनी या सचिन रोडे नामक विकासाच्या माध्यमातून सुरू केले. मनपा प्रशासनाने दिलेल्या परवानगीनुसार नियमांचे तंतोतंत पालन करून बांधकाम करीत असताना शिल्पा पाचघरे यांचा बांधकामाशी कोणताही संबंध नसताना त्यांनी ते बंद पाडण्याचा प्रयत्न केला. दरवेळी कोणत्या ना कोणत्या कारणावरून शिल्पा पाचघरे बांधकामांमध्ये आडकाठी आणत होत्या. केवळ खंडणी उकळण्याकरिता त्यांनी भाजपच्या तथाकथित पदाधिकारी असल्याचा बनाव केला. भाजप महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष असल्याचे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून बांधकामावर स्थगिती आणली. त्यांनी बांधकाम होऊच नये याकरिता भाजप प्रदेश उपाध्यक्ष असल्याचा बनाव करीत चक्क मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सुद्धा दिशाभूल केली. तर दुसरीकडे या संदर्भात हायकोर्टाचा दरवाजा खटखटल्यामुळे हायकोर्टाने बर्गी यांना न्याय दिला व बांधकाम पुन्हा सुरू झाले. त्यानंतरही हायकोर्टाच्या आदेशामुळे बांधकाम सुरू ठेवल्याने त्यांनी हल्लेखोरांकडून बांधकामावरील मजुरास अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देत बांधकामात अडथळा निर्माण केला. बांधकाम आवारात लावलेले बॅनरही त्या हल्लेखोरांनी फाडले. त्यामुळे शिल्पा पाचघरे धमकी व दबाव तंत्राचा वापर करीत असल्याने आमच्या जीवितास धोका असल्यामुळे पोलीस संरक्षण देण्यात यावे तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

# फिरती बस घडवेल विद्यार्थ्यांना अंतराळाची सफर : इस्रोची खास बस चांदूरबाजार नगरपरिषद विद्यालयामध्ये दाखल

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

विद्यार्थ्यांना अंतराळाची सफर घडवणारी खास फिरती बस चांदूरबाजार नगरपरिषद विद्यालयामध्ये दाखल झाली असून ही बस विद्यार्थ्यांसाठी आकर्षणच केंद्र बिंदू बनत आहे भारताची कार्यरत असलेली अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोदेशातील अनेक अंतराळ मोहीमा यशस्वीरीत्या राबवून या संस्थेने देशाचे नाव जगभर पोहोचविले आहे अशा या संस्थेची माहिती सर्वसामान्यांना फारशी नसते ही माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यासाठी इस्त्रोची स्पेस ऑन व्हिल्स ही फिरती बस आकर्षणाच केंद्र बिंदू बनत आहे भारतीय अंतराळ




संशोधन संस्थेच्या मोहीमांची व आतापर्यंतच्या अंतराळ प्रवासाची माहिती या गाडीच्या माध्यमातून देण्यात आली आहे यात चांद्रयान-१ मोहीम, मंगलयान मोहीम, अवकाशात सोडलेले विविध उपग्रह तसेच इस्त्रोच्या एकूणच आतापर्यंतचा अंतराळ प्रवास या बस मधे विद्यार्थ्यांना पहायला मिळाला यावेळी नगर परिषद विद्यालयामध्ये अंतराळ या विषयावर व इस्त्रो ने केलेल्या कामगीर या विषयावर रांगोळी स्पर्धा,चित्रकाला स्पर्धे च आयोजन करण्यात आला होत उद्धघाटक गटशिक्षण अधिकारी वकार युनूस खान हे लाभले होते तसेच प्रा.डॉ.शुबदा ठाकरे तांत्रिक अभियांत्रिकी,सुधाकर पानझडे मुख्यधिकारी,प्रमोद राऊत सह पोलीस निरीक्षक, निखिल कोरडे उद्योजक, मुख्यध्यापक कैलास इंगळे, सह पत्रकार, शिक्षक उपस्थित होते.

# जिल्ह्यात रब्बी हंगामात १०२ टक्के पेरणी हरभऱ्याचे क्षेत्र अधिक तर गव्हाचे कमी

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

यंदाच्या रब्बी हंगामातजिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत १०२ टक्के पेरणी झाली आहे. त्यामध्ये हरभऱ्याचे क्षेत्रच अधिक असून गव्हाच्या पेरणीस अजूनही हवी तशी गती आलेली नाही. जानेवारीच्या अखेरपर्यंत पेरणी होत असली, तरी आता गव्हाचे पेरणीक्षेत्र जेमतेम वाढणार असल्याचा कृषी विभागाचा अंदाज आहे. जिल्ह्यात १ लाख ६ हजार हेक्टर क्षेत्रात हरभरा पिकाची पेरणी झाली आहे.



जिल्ह्यात रब्बी हंगामात सरासरी १ लाख ४८ हजार ७९ हेक्टर क्षेत्र आहे. आतापर्यंत १ लाख ५२ हजार ७० हेक्टरक्षेत्रात पेरणी झाली आहे. रब्बी हंगामात हरभरा व गहू ही मुख्य पिके असून ज्वारी, मका या तृणधान्याचीही पेरणी काही भागात केल्या जाते. गेल्या काही वर्षांपासून हरभऱ्याच्या क्षेत्रात वाढ होत असून त्या तुलनेत गव्हाचे क्षेत्र कमी होत आहे. यंदाही १ लाख ६ हजार ३०२ हेक्टर क्षेत्रात हरभऱ्याची पेरणी झाली असून त्यातुलनेत गव्हाचे क्षेत्र मात्र फारच कमी आहे. ३९ हजार ५०९ हेक्टरमध्ये गव्हाची पेरणी झाली आहे. सिंचनाच्या कमी सोयी व जमिनीतील कोरडेपणा यामुळे गव्हाचे क्षेत्र कमी झाल्याचे सांगण्यात येत आहे.हरभऱ्यास कमी पाणी लागत असून दोन पाळ्यांमध्ये ते पीक येते. तर गव्हाला पाच पाळ्या पाणी सिंचनासाठी लागते. त्यामुळे कमी सिंचनात हाती येणारे पीक म्हणून शेतकऱ्यांनी हरभऱ्याचे क्षेत्र वाढविल्याचे कृषी विभागाने म्हटले आहे.

**ज्वारीची पेरणी कमी**

सद्या ग्राहकांकडून ज्वारीला मागणी वाढली असली, तरी रब्बी हंगामात या पिकाचे क्षेत्र वाढू शकले नाही. खरिपातही ज्वारीचे क्षेत्र कमीच होते. यावर्षी रब्बी हंगामात मेळघाटातील धारणी ११३ व चिखलदरा तालुक्यात १२८ हेक्टरमध्ये ज्वारीची पेरणी झाली. अमरावती २८, चांदूर रेल्वे ४२, मोर्शी ५०, वरूड ४, दर्यापूर ७ व चांदूरबाजारमध्ये ५ हेक्टर अशा एकूण ३७७ हेक्टरमध्ये ज्वारीची पेरणी झाली आहे.

# भारत संकल्प यात्रेकरिता खासदार डॉ अनिल बोंडे यांचा तामिळनाडू येथील दिंडीगुल ( मधुराई) येथे तिन दिवसीय दौरा

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

देशाचे पंतप्रधान मा श्री नरेंद्रजी मोदी यांनी आयोजित केलेल्या योजनांची माहिती ग्रामिण भागातील लोकांना पर्यंत पोहचविण्याच्या अनुषंगाने विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन केले आहे. त्याच अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील राज्यसभा खा.डॉ. अनिल बोंडे यांचा तामिळनाडू राज्यातील दिंडीगुल (मधुराई)येथे तीन दिवसीय दौऱ्याचे आयोजन केले आहे. देशाचे पंतप्रधान मा नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या कार्याचा व योजनांची माहिती विकसित संकल्प भारत यात्रेमध्ये राज्यसभेचे या दौऱ्यामध्ये तामिळनाडू राज्यातील मधुराई येथील काही गावांमध्ये भेटी देणार आहे देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र जी मोदी यांनी केलेल्या संपूर्ण कार्याचा व योजनांची चित्रफित द्वारे म्हणजेच विकसित भारत संकल्प रथयात्रेमध्ये केलेल्या कामांचा माहिती संपूर्ण लोकांपर्यंत पोहोचावी या दृष्टिकोनातून या दौऱ्याचे नियोजन करण्यात आलेले आहे त्याच अनुषंगाने आज दि.०७/०१/२०२४ ला खा.डॉ. अनिल बोंडे हे तामिळनाडू राज्यातील दिंडीगुल (मधुराई) येथील भागांमध्ये गेलेले असताना त्यांचे स्वागत तेथील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या द्वारे करण्यात आले या दौऱ्यामध्ये त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. वसुधा बोंडे उपस्थित आहेत

# वाहन चालकांनो सावधान; वाहनांना ताडपत्री नसल्यास होणार ५० हजारांचा दंड

## गौण खनिज वाहून नेताना वाहनाला हवे ताडपत्रीचे कव्हर



**अरुण जोशी**

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वाहनातून गौण खनिजाची वाहतूक करताना वाहनाला ताडपत्री लावणे बंधनकारक असतानाही अनेक जण चालक याकडे कानाडोळा करतात. मात्र चालकांनी आता असा कानाडोळा केला, तर ५० हजार रुपये दंड व परवाना निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे. नववर्षाच्या सुरुवातीपासून जिल्ह्यात या कारवाईसंदर्भात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्यामुळे गौण खनिज वाहून नेताना ताडपत्रीने कव्हर न करणे वाहन चालकांना चांगलेच महागात पडणार आहे. पूर्वी हा दंड ५० हजार ऐवजी पाच हजार रुपये होता. आता दहापट वाढ केली आहे.

अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रेती घाट, वीट्टभट्टी, आहेत. त्यामुळे जिल्ह्यातून मोठ्याप्रमाणात रेतीची, विटांची, वाहतूक केली जात असते. गौण खनिजाची वाहतूक करताना वाहनाला ताडपत्रीने पूर्णतः झाकून नेण्याचानियम आहे. मात्र, अनेक चालक याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी तेथून निघणारी धूळ इतर वाहन चालकांच्या डोळ्यात जाऊन अपघाताची शक्यता असते. यावर आळा घालण्याच्या अनुषंगाने १ - जानेवारी २०२४ पासून गौण खनिज वाहतूक करताना जर वाहनाला ताडपत्रीने पूर्णतः झाकले नसेल, तर ५० हजार रुपयांपर्यंत दंड व परवाना निलंबित करण्याचा इशारा आरटीओ राजाभाऊ गित्ते यांनी दिला आहे.

### असा होणार दंड

राख, विटा, वाळू आदी गौण खनिजाची वाहतूक करताना वाहनास ताडपत्रीने झाकले नसताना आढळून आल्यास दहा हजार रुपये दंड व दहा दिवस परवाना रद्द, दुसऱ्यांदा आढळून आल्यास २० दिवस परवाना निलंबन व २० हजार रुपये दंड, तिसऱ्यांदा आढळून आल्यास ५० हजार रुपये दंड व ५० दिवस परवाना रद्द करण्यात येणार आहे.


### प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचा निर्णय

गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनास ताडपत्री कव्हरने न झाकून वाहतूक करणाऱ्या वाहनावर परवाना निलंबनाची विभागीय व दंडनीय कार्यवाही करण्याबाबत ११ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यात आला होता.१ जानेवारी २०२४ पासून अमंलबजावणी करण्यात येत आहे.

# जिल्ह्यात 'जेएन-१' चे २३ रुग्ण

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्ह्यात 'जेएन-१' या कोरोनाच्या नव्या विषाणूची आतापर्यंत २३ रुग्णांची नोंद झाली असून, त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) मध्ये उपचार करण्यात येत असून, या रुग्णांना गृह विलगीकरणात राहण्यास सांगण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.



सदर कोरोना विषाणूमुळे पुन्हा एकदा प्रशासन अलर्ट झाले असून,इर्विन रुग्णालयात एक स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला आहे. या विषाणूचा पहिला रुग्ण गत २३ डिसेंबर रोजी धामणगाव गढी येथे आढळला होता. तेथील २१ वर्षीय युवकाची संशयीत कोरोना पॉझिटीव्ह म्हणून नोंद झाली होती. त्यानंतर आतापर्यंत एकूण २३ रुग्णांची नोंद झाली असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहे. त्यापैकी बहुतांश रुग्ण बरे होऊन घरी परतले असून, त्यांना गृहविलगीकरणात राहण्याचे सांगण्यात आले आहे.

# सात खरेदी-विक्री संघांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## आजपासून १२ फेब्रुवारी पर्यंत चालणार निवडणूक प्रक्रिया

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सातखरेदी-विक्री संघांच्या संचालकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने येथे सहकार नेत्यांना निवडणुकीची प्रतीक्षा लागली होती. दरम्यान, जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने आज निवडणुकीचे वेळापत्रक जारी केले असून, त्यानुसार ११ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

जिल्ह्यातील अचलपूर, मोर्शी, वरूड, अमरावती, तिवसा व चांदूर रेल्वे या ठिकाणच्या सात खरेदी-विक्री संघांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. सोमवार ८ ते १२ जानेवारीदरम्यान हा निवडणूक कार्यक्रम चालणार आहे. यापैकी पाच मतदारसंघांसाठीची मतमोजणी १२ फेब्रुवारी रोजी, तर दोन मतदारसंघांची मतमोजणी ११ फेब्रुवारी रोजी होणार आहे. जिल्हा सहकार निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी हे वेळापत्रक जारी केले. नुकताच जिजाऊ को-ऑपरेटिव्ह बैंक आणि महात्मा फुले बँकेची निवडणूक पार पडली. त्यानंतर आता खरेदी व विक्री संघांची निवडणूक जाहीर झाली आहे. दरम्यान, या वेळापत्रकाचा अंदाज असल्याने संबंधित सहकार नेते आधीच कामाला लागले असून,आता खऱ्या अथनि रणधुमाळील वेग येणार आहे.

**पाच सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे वेळापत्रक**

अमरावती सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्था अमरावती, अचलपूर तालुका शेतकी खरेदी-विक्री संस्था, डॉ. भा. पं. दे. खरेदी-विक्री संस्था तिवसा, मोर्शी तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था, वरुड तालुका सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्थांसाठी ८ ते १२ जानेवारीदरम्यान उमेदवारी अर्जाची उचल व दाखल तसेच यादी प्रसिद्ध होणार आहे. १५ जानेवारी रोजी छाननी, १६ जानेवारी रोजी उमेदवारी अर्जाची यादी प्रसिद्ध करणे, ३० जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेणे, ३१ जानेवारीपर्यंत बोधचिन्हासह उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे, ११ फेब्रुवारी रोजी मतदान तर १२ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**या दोन संस्थांची मतमोजणी ११ फेब्रुवारीला**

विकास खंड सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्था व जिल्हा शासकीय कृषी विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था, अमरावती या दोन संस्थांचा निवडणूक कार्यक्रम उपरोक्त ५ सहकारी संस्थांप्रमाणेच असून मतमोजणी मात्र ११ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# अंगणवाडी सेविकांच्या संपावर अद्यापही तोडगा नाही

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आपल्या विविध मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांनी गेल्या ४ डिसेंबरपासून संप पुकारला आहे. परंतु, अद्यापही त्यावर तोडगा निघालेला नाही. अशात प्रशासनाने संपकयां अंगणवाडी सेविकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यावर प्रशासनाकडून दडपशाही केली जात असल्याचा आरोप अंगणवाडी, बालवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने करण्यात आला आहे. त्याविरोधात आज, सोमवार, ८. जानेवारी रोजी जिल्हा परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे.



जिल्हाभरात महिनाभरापासून २ हजार ४६२ अंगणवाडी सेविका, मदतनीस विविध मागण्यांसाठी संपावर गेल्या आहेत. त्यामुळे सर्व अंगणवाडी केंद्रांना टाळे लागले आहेत. परिणामी, आता जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने संपावर गेलेल्या अंगणवाडी सेविकांना विना परवानगीने गैरहजर असल्याचे कारण पुढे करीत नोटीस बजाविलेल्या आहेत. अंगणवाडी सेविकांना दरमहा २६ हजार आणि मदतनीसांना २० हजार रुपये मानधन द्यावे, कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा यासह अन्य मागण्यांसाठी अंगणवाडी कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. या संपामुळे महिनाभरापासून अंगणवाड्यांना टाळे लागले. परिणामी, अंगणवाडी केंद्रातील कामकाज खोळंबले आहे. अशात प्रशासनाकडून अंगणवाडी सेविकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.